# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( अभिलेख विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. महासभेत |
|---|---|
| | दि. ०७/०५/२०१६ रोजी |
| | सकाळी ११:०० वाजता |
| | प्रकरण क्र. १ ते २५ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : तहकूब - २८/०६/२०१६

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

(१)

१६/१७

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ ४६ /२०१६-१७ दिनांक :-२२/०६/२०१६.

## // परिपत्रक //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ____________________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**महोदय/महोदया,**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, दि. ०७/०५/२०१६ रोजी मा. महासभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी ठाणे जिल्हा विधान परिषदेची द्विवार्षिक निवडणूक जाहिर झाल्याने ठाणे जिल्ह्यात आचारसंहिता लागु झाली होती. करिता दि. ०७/०५/२०१६ रोजीची मा. महासभा घेता आली नव्हती. सदर सभेच्या विषयपत्रिकेवरील प्रकरण क्र. १ ते २५ तसेच पुरक घोषणेवरील प्रकरण क्र. २६ ते ३० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **मंगळवार, दिनांक २८/०६/२०१६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित रहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

(हरेश ल. पटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

**महापौर दालन**

जा.क्र मनपा/ /२०१६-१७ दिनांक :-२२ /०६ /२०१६

**प्रति,**
**मा. नगरसचिव**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- दि. ०७/०५/२०१६ रोजीची न झालेली मा. महासभा आयोजित करणेबाबत.**

महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दि. ०७/०५/२०१६ रोजी मा. महासभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी ठाणे जिल्हा विधान परिषदेची द्विवार्षिक निवडणूक जाहिर झाल्याने ठाणे जिल्ह्यात आचारसंहिता लागु झाली होती. करिता दि. ०७/०५/२०१६ रोजीची मा. महासभा घेता आली नव्हती.

तरी सदरची सभा दि. २८/०६/२०१६ राजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करावी.

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

**महापौर दालन**

जा.क्र मनपा/ /२०१६-१७ दिनांक :- २२/०६/२०१६

प्रति,
**मा. नगरसचिव**
मिरा भाईंदर महानगरपालिका

***विषय :- दि. ०७/०५/२०१६ रोजीची न झालेली मा. महासभा आयोजित करणेबाबत.***

महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दि. ०७/०५/२०१६ रोजी मा. महासभेचे आयोजन करण्यात आले होते. तथापी ठाणे जिल्हा विधान परिषदेची द्विवार्षिक निवडणूक जाहिर झाल्याने ठाणे जिल्ह्यात आचारसंहिता लागु झाली होती. करिता दि. ०७/०५/२०१६ रोजीची मा. महासभा घेता आली नव्हती.

तरी सदरची सभा दि. २८/०६/२०१६ राजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करावी.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

Document1

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/०५/२०१६.

## मा. महासभा दि. ०७/०५/२०१६
पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक ०७/०५/२०१६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| २६ | सन्मा. सदस्य श्री. राकेश रतिशचंद्र शाह यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत. |
| २७ | सन्मा. सदस्य श्री. हरीश्चंद्र आमगावकर यांचा दिनांक ३०/०४/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेबाबत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत. |
| २८ | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा पुतळा बसविणेबाबत. |
| २९ | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०२/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसान दुर करण्यासाठी महापालिकेमार्फत ठोक मानधनावर शिक्षकांची भरती करणेबाबत. |
| ३० | सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दिनांक ०३/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण २७, ठराव क्र. ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व रस्ते विकसित करणेबाबतच्या ठरावावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. |

(हरेश ल. पाटील)
महापालिका नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\01 Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\04 Purak Ghoshna\01 Purak Ghoshana 12-17\Purak Ghoshana - 14-15.doc

# राकेश रतीशचंद्र शाह
सभापती
प्रभाग समिती क्र. ४
मिरा भाईंदर महानगरपालिका
**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

सचिव/मुख्यो/.../...

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क : शॉप नं. ९, शिवनेरी बिल्डींग, बी. पी. क्रॉस रोडनं. ४, साऊथ, खारीगांव, भाईंदर (पूर्व), जि. थाणे - ४०१ १०५.
मोबाईल : 9870099447 / 9930331778 Email : shivshaktideco@gmail.com

दिनांक : ____________

दि.०७/०५/२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

प्रकरण क्र. २६ करिता

प्रति,
मा. नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

महोदय,

भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, थोर कवी, भारतीय मिसाईल चे जनक, भारतरत्न श्री. ए. पी. जे. अब्दुल कलाम याचे देशभरात विविध ठिकाणी स्मारक व पुतळे उभारले जात आहेत तसेच प्रथम गृहमंत्री, नविन भारताचे निर्माता, राष्ट्रीय एकतेचे शिल्पकार, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे देखील देशविदेशात मोठी स्मारके पुतळे उभारलेले आहेत सध्या आशिया खंडातील सर्वात मोठा पुतळा गुजरात मध्ये उभारला जात आहे. त्यामुळे त्यामध्ये मिरा भाईंदर शहरामध्ये देखील त्यांचे यथोचित असे पुतळे उभारुन खारीचा वाटा उचलावा अशी आमची व शहरवासीयांची भावना आहे.

या भावनेचा आदर करता शहरातील भाईंदर (पु.) येथील जेसल पार्क चौपाटी येथे **भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम** यांचा पुतळा व मिरारोड (पु.) येथील जॉगर्स पार्क मध्ये **लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत मा. महासभेमध्ये निर्णय घेणेबाबत "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.**

आपला विश्वासू,

(राकेश आर. शाह)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(9)

प्राप्त दि. 30/4/16

सचिव/पु.प्रो/०२/२०१६-१७, दि.३०/०४/१६

# श्री. हरीश्चंद्र रा. आमगांवकर

# सभापती

## स्थायी समिती

## मिरा भाईंदर महानगरपालिका

जावक क्र.मनपा/सभ/स्था.स./२०/२०१६-१७ दिनांक : ३०/०४/२०१६

दि. ०७/०५/२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

प्रकरण क्र. २७ करिता

प्रति,

मा. नगरसचिव,

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :-** **भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारणेबाबत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.**

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र. १२२ खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असून सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र ४६.७०० चौ.मीटर आहे. त्यापैकी विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ३०५३३.६० मीटर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेली आहे. सदर ताब्यातील क्षेत्राच्या १५% च्या मार्यादेत म्हणजेच ४५८०.०४ चौ.मीटर क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय आहे. सदर आरक्षणात अग्निशमन केंद्र बांधकाम मंजूर असून त्यासाठी लागणारे ३८९.१२ चौ.मीटर क्षेत्र लागणार आहे. उर्वरीत ४१९०.९२ चौ.मीटर क्षेत्रावर बांधकाम करणे अनुज्ञेय आहे. सदर जागेमध्ये **हिन्दु हृद्य सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्यात यावे.** त्याकामी अनुभवी तांत्रिक सल्लागार म्हणून आर्ट डायरेक्टर श्री. नितीन देसाई यांची नेमणूक करावी. त्यांच्या मार्फत कामाचे आराखडे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात यावे. तसेच सदर स्मारक उभारण्यासाठी शासकीय परवानगीची गरज नसल्याने महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूरी घेवून तातडीने निविदा प्रक्रिया करण्यात यावी व अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सदर काम सुरु करण्यात यावे असा मी प्रस्ताव मांडत आहे.

आपला विश्वासू,

(हरीश्चंद्र आमगावकर)
सभापती, स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन भाईंदर (प.), ता.जि. ठाणे -४०१ १०१. © ०२२-२८१९३०८१
कार्यालय : शॉप नं. १, हिमांशू अपार्टमेन्ट, काशीनगर, विमल डेरी रोड, भाईंदर (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०५.
मो. ९०२११२९८०, ई-मेल : harishchandra.aamgaonkar@gmail.com

प्रनपा/सचिव/पु.प्रो./३/१६-७०
दि. ०२/५/२०१६


# डॉ. आसिफ शेख

M.Com., B.Ed., Ph.D.

सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

नगरसेवक व मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका


जावक क्र. ____________ दिनांक 02/04/2016

<u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम – १९४९ चे कलम "ज" अन्वये प्रस्ताव</u>

प्रकरण क्र. २८ करिता

प्रति,

मा. नगरसचिव सो.,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा पुतळा बसविणेबाबत...

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात राष्ट्रपिता महात्मा गांधीजी, यांचा पुतळा बसविण्याबाबत मा. महासभा दि. ३०/०१/२०१६ (तहकुब सभा दि. १८/०१/२०१६) रोजी **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम – १९४९ चे कलम "ज" अन्वये प्रस्ताव** मा. महासभेपुढे दिल्यानंतर मा. महासभेने सदरचा प्रस्ताव चांगला असून पुढील मा.महासभेत घेण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला होता. परंतू सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे आलेला नाही.

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा अर्धकृती पुतळा मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रांगणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती पुतळ्या शेजारी बसविणे बाबत प्रशासनाची मान्यता असून सदरची जागा अंत्यत योग्य आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धकृती पुतळ्या शेजारी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांचा अर्धकृती पुतळा बसविण्यात यावा, असा प्रस्ताव मी दि. ०७/०५/२०१६ रोजी होणाऱ्या मा. महासभेपुढे देत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे घेण्यांत यावा, ही विनंती.

(डॉ. आसिफ शेख)


संपर्क कार्यालय : सी/३, अशोक नगर, दत्त मंदिर जवळ, भाईंदर (प.), जि. ठाणे - ४०१ १०१. : ✆ 022-28180244 भ्रमणध्वनी : 09820720767

E-mail : draasifshaikh@yahoo.com Website : www.draasifshaikh.in

પ્રાપ્તિ. ૨૪।૭૯
[illegible]-૧૨.૨૦૦૫

# डॉ. आसिफ शेख

M.Com., B.Ed. (Mum.), Ph. D.(U.K.)

सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

नगरसेवक व मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका


मनपा/सचिव/पु-घेप/ ४/४ /१६-१७

दि. ०४/५/२०१६

जावक क्र. ———— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम 'ज' अन्वये प्रस्ताव दिनांक ०२/०५/२०१६

प्रति,
मा.नगरसचिव,
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रकरण क्र. २९ करिता

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसान दूर करण्यासाठी महापालिकेमार्फत ठोक मानधनावर शिक्षकांची भरती करणेबाबत.**

**महोदय,**

मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमध्ये इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत मराठी, हिंदी, उर्दु व गुजराथी माध्यमांच्या शाळा असून त्यामध्ये मराठी – २२, हिंदी – ०४, गुजराथी – ०४ व उर्दु – ०५ याप्रमाणे ३५ शाळांमध्ये सुमारे ९,५०० गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत असून एकूण १९२ शिक्षक कार्यरत आहेत. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षकांचा हक्क नियम २०११ हा कायदा पारित झालेला असून त्यांची अंमलबजावणी दि. ०१/०४/२०१० पासून सुरू झालेली आहे. त्याप्रमाणे मिरा भाईंदर महापालिका शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत व सदरच्या अधिनियमाप्रमाणे मोफत शिक्षण देणे व आवश्यक ते शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे तसेच शिक्षणाचा दर्जा उंचावणे हे घटनात्मकरित्या आवश्यक आहे.

मिरा भाईंदर महापालिका शिक्षण मंडळातील शाळांमध्ये एकूण ३४३ शिक्षकांची आवश्यकता असतांना फक्त १९२ शिक्षक असल्यामुळे विद्यार्थ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे. शासनाच्या शिक्षण विभागाकडे तसेच संचालक / उपसंचालक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे देखील प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग व आयुक्त, मिरा भाईंदर यांनी यापूर्वीच मागणी करून देखील आवश्यक शिक्षक वर्ग उपलब्ध करून देण्यांत आलेला नाही. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.

मिरा भाईंदर मनपाच्या काही शाळांमध्ये सेवाभावी संस्थेने (एन.जी.ओ.) बाहेरून काही शिक्षक उपलब्ध करून दिलेले असून त्यांचे मासिक मानधन देखील सेवाभावी संस्था शिक्षकांना देत आहे, ही परिस्थिती दीड हजार कोटींचा अर्थ संकल्प असलेल्या आपल्या मनपासाठी लाजीरवाणी व शरमेची आहे. तसेच मनपाने ठोक मानधनावर आवश्यक असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्याची भरती करणेबाबत आम्ही स्वतः मा.महासभा, दि. ०४/०९/२०१५ रोजी 'ज' अन्वये प्रस्ताव दिलेला असतांना देखील आजपर्यंत गोरगरीब व मध्यमवर्गीय शाळकरी मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षक उपलब्ध करून देण्यांत आलेले नाहीत, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

तसेच मा.महासभा, दि. ११/१२/२०१३, ठराव क्र. ५९ अन्वये इयत्ता ९ वी व १० वी चे वर्ग नैसर्गिकरित्या गरीब विद्यार्थ्यांसाठी सुरू करणेबाबत ठराव होऊन देखील आजपर्यंत कोणतीच कार्यवाही न झाल्यामुळे मनपा शाळेतील शेकडो विद्यार्थी इयत्ता ९ वी व १० वी च्या शिक्षणापासून वंचित राहतात व त्यांना खाजगी शाळेत प्रवेश देखील मिळत नसल्यामुळे ते एकंदरीत बालमजुर म्हणून इतरत्र काम करीत असल्याचे दिसून येत आहे, ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मराठी माध्यमासाठी ४३, उर्दु माध्यामासाठी ३३, हिंदी माध्यमासाठी ५३, याप्रमाणे शिक्षकांची आवश्यकता आहे. शासनाच्या शिक्षण विभागाकडून जो पर्यंत आवश्यक असलेले शिक्षक उपलब्ध होत नाहीत. तो पर्यंत महापालिकेमार्फत वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन व रितसर मुलाखती घेऊन ठोक मानधनावर आवश्यक शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची भरती करण्यांत यावी,

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे घेण्यांत यावा, हि विनंती.

(डॉ.आसिफ शेख)


संपर्क कार्यालय : सी/3, अशोक नगर, दत्त मंदिर जवळ, भाईंदर (प.) - 401101 ✆:022-2818 0244 भ्रमणध्वनि : 09004111777 / 09820720767

Email : draasifshaikh@yahoo.com ★ Website : www.draasifshaikh.in

प्रा.प.मि. २/०५/२०७६

१२.२०

लेख - ९२-२०७१.

[illegible]

२५/७६

सचिव/पुप्रो/४/२०१६-१७, दि. ०३/०५/२०१६.


**श्री. जुबेर अ.इनामदार**

**नगरसेवक**

**गटनेता - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विशेष कार्यकारी अधिकरी - महाराष्ट्र शासन

**निवास :** १०१, मिरा स्मृती अपार्ट., नयानगर, मिरारोड (पुर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

**मुख्य कार्यालय :** सेंटर काँग्रेस कार्यालय, नयानगर, मिरारोड (पुर्व),ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

**भ्रमणध्वनी : 9820318999 Email ID : inamdarzub@yahoo.com**


प्रकरण क्र. ३० करिता - ०३/०५/२०१६.

**प्रति,**

**मा. नगरसचिव सो.,**

**मिरा भाईंदर महानगरपालिका.**

**विषय :- मा. महासभा दि. ०७/०५/२०१६ अनुसुची - 'ड' प्रकरण नियम 'ज' अन्वये प्रस्ताव सादर.**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आम्ही खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ३३, परिशिष्ट ४ मधील ६ अन्वयेच्या तरतूदीनुसार मालक किंवा पट्टाधारक यांनी सुविधा विकसीत करुन हस्तांतरीत केल्यास हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रा इतके विकास हक्क प्रमाणपत्र जमीनधारक किंवा पट्टाधारक यांना देता येतो. या तरतूदीनुसार रस्ता किंवा आरक्षणे ही एकाच मालकाची असल्यास, या तरतूदीचा अवलंब करता येतो. तथापि, रस्ता व बांधकाम योग्य आरक्षणे यांचा मालकीहक्क विविध धारकांकडे/विकासाकडे/ उपविकासकाकडे / अधिकारपत्रधारकाकडे असल्यास या तरतूदीचा वापर करता येत नाही. तसेच विकास नियंत्रण नियमावलीमधील बाब क्र. ९(IV)(A) नुसार नियोजित रस्ते हे महानगरपालिकेस विकसीत करता येतात. इतरांनी रस्ते विकसीत करण्याची तरतूद नाही. त्यामुळे मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये रस्ते व बांधकाम योग्य आरक्षणे विकसीत करावयाचे असल्यास, अशा सोयी सुविधांचे अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करुन संभाव्य खर्चाचा आढावा घेण्यात यावा व सुविधेसाठी होणा-या संभाव्य किमान खर्चावर आधारीत त्या-त्या नियोजन प्रभागातील बाजारमुल्य तक्त्यातील दरानुसार विकास हक्क प्रमाणपत्र खर्चाचे प्रमाणात क्षेत्राचे स्वरुपात देण्यात येईल, या अटीवर जाहीर निविदा मागवून स्पर्धात्मक जो विकासक / कंत्राटदार कमीत-कमी विकास हक्क प्रमाणपत्र घेण्याचे बोली निविदा पध्दतीनुसार सादर करेल. त्यास या सुविधा विकसीत करण्यासाठी कार्यादेश देता येवू शकेल. या पध्दतीनुसार सुविधा विकसीत केल्यास महानगरपालिकेचा खर्च होणार नाही. तसेच सुविधा विकासासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता भासणार नाही. सुविधा / विकास कामे ही महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमानुसार, कार्यप्रणाली व संहितेप्रमाणे होवू शकतात. तसेच या विकसीत होणा-या सोयी सुविधांची गुणवत्ता तपासणी व इतर बाबी ह्या महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार होणे आवश्यक राहील. तसेच मि.भा.मनपा महासभा दि. ३०/०७/२०१० प्रकरण २७, ठराव ३२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे आरक्षण व रस्ते विकसीत करणेबाबतच्या ठरावावर चर्चा करुन निर्णय घेणेबाबत...

सुचक - श्री. इनामदार जुबेर

अनुमोदक - श्री. प्रमोद सामंत

प्राप्त दि. ३/४/१६
स. ११.०० वा.
[illegible]
३/४/१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०४/२०१६.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०१, दिनांक २८/०४/२०१६**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. ०७/०५/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. २८/०४/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
### मा. महासभा सुचना क्रमांक ०१, दि. २८/०४/२०१६ सोबतची विषय पत्रिका
### सभा शनिवार दि. ०७/०५/२०१६

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ०१ | दि. ०४/०९/२०१५, दि. १५/१०/२०१५, दि. ०४/१२/२०१५ व दि. १८/०१/२०१६ (दि. ०४/१२/२०१५ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ०२ | पावसाळ्यापूर्वी नाले सफाई कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ०३ | जलसंपदा विभागाच्या भातसा धरणातून २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिरा भाईंदर शहरास मिळणेबाबत. |
| ०४ | मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ०५ | भाईंदर (पूर्व) नवघर येथे जेट्टी बांधणे कामाबाबत. |
| ०६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे तयार करणेबाबत. |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नव्याने आयुक्तालय निर्माण करण्याकरीता शासनास नाहरकत दाखला देणेबाबत. |
| ०८ | पोलिस आयुक्तालयासाठी जागा आरक्षित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत. |
| ०९ | सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापरासंबंधीची तरतूद मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करणेबाबत. |
| १० | महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर संबंधित कामे करण्यासाठी खाजगी संस्थेकडून निविदा मागविणेबाबत. |
| ११ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेचे ठिकाण स्थलांतरीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १२ | उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने, मैदाने, स्मशानभुमी, चौपाट्या, नर्सरी, दुभाजक इ. ची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत. |
| १३ | मिरारोड रेल्वेस्टेशन जवळील गांवदेवी नं. १ झोपडपट्टीतील डि.पी. रोडवर वसलेल्या झोपड्यांच्या पुर्नवसनाबाबत. |
| १४ | केंद्रशासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण, संचलन/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत. |
| १५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र. ३५२-अ या शासनाच्या जमिनीवर जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) विकसित करणेबाबत. |
| १६ | परवाना विभागाच्या देयकांबाबत. |
| १७ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्याबाबत निर्णय घेणे. |
| १८ | शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे योजनेबाबत विनियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेसह त्याअंतर्गत अनुज्ञेय २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल मर्यादित वाढ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत. |
| १९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन ई-वाचनालयासंबंधीचे धोरण ठरविणेबाबत. |
| २० | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-०४ या संवर्गातील सफाई कामगार पदावर कार्यरत असलेल्या |

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| | कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ पदाचा लाभ देणेकरीता शैक्षणिक अर्हता शिथील करणेबाबत. |
| २१ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM या केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस GCC या तत्वावर चालविण्यासाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| २२ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत माहिमेस मुदतवाढ देणेबाबत. |
| २३ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शासकीय कार्यालयांना भाडेतत्वावर दिलेल्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबत. |
| २४ | विशेष निधी अंतर्गत विकास कामांना मान्यता देणेबाबत. |
| २५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कारवाई केलेली वाहने ठेवण्यासाठी वाहतुक विभागास जागा देणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- २८ एप्रिल २०१६**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. ०७/०५/२०१६ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **३३ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शांतता क्षेत्राचे लावलेल्या फलकाची साईज किती चौरस मीटर आहे? |
| अ) एकूण लावलेल्या प्रत्येकी साईजप्रमाणे किंमत किती? |
| ब) एकूण किती खर्च आलेला आहे? |
| क) शांतता क्षेत्र लावलेल्या फलकाच्या ठिकाणी योग्यतेने पालन होते का आणि सदरची जबाबदारी कोणाची? |
| ड) आतापर्यंत शांतता क्षेत्राचे उल्लंघन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आली? नाव व त्यांची एकूण दंडात्मक कारवाई केली त्याची माहिती? |
| **३४ डॉ. नयना मनोज वसाणी मा. सदस्या यांनी दि. १३/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) राशनिंग कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणे तसेच सदर ठिकाणी पाणी मीटर कार्यशाळेचेही बांधकाम करुन घेणे असा ठराव पारित झाला होता का? |
| अ) सदर ठरावाच्या अनुषंगाने राशनिंग कार्यलय उभारण्यात येऊन भाड्याने देण्यात आले आहे. तरी पाणी मीटर कार्यशाळेचे बांधकाम का झाले नाही? |
| ब) बांधकाम झाल्यास त्या ठिकाणी पाणी मीटर तपासणी कार्यालयाचे विधिवत काम का सुरु झाले नाही? |
| क) या विषयावर संबंधित अधिकाऱ्याने काय कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा? |
| **३५ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. १६/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी प्लास्टीक पिशव्या जप्त करणेबाबत महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी.आर. कॉपी देणे. |
| अ) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्ती करणेबाबत देण्यात आलेल्या आदेश प्रती. |
| ब) महानगरपालिका क्षेत्रात आजपर्यंत ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या एकूण किती जप्त केल्या आहेत? |
| क) महापालिकेने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्त केलेल्या दंडाची माहिती देणे. |
| **३६ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २५/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. महासभा दि. १६/०५/२०१३ मध्ये घेतलेला माझ्या प्रश्ना (रिलायन्स) संबंधीत जे काही आश्वासन मला देण्यात आले होते त्याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली आहे? |
| अ) मा. महासभा दि. ०५/०६/२०१३ मध्ये घेतलेला माझा प्रश्न ओ.एल.टी. बाबत दिलेल्या आश्वासनबाबत आजपर्यंत काय कारवाई केली आहे? |
| ब) प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी नियमानुसार बनविण्यासाठी आतापर्यंत काय केले आहे. याबाबतची माहिती त्वरीत देण्यात यावी. प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय कायदा आहे? |
| **३७ श्रीम. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील आर.जी. च्या जागांबाबत खालील प्रश्न चर्चेसाठी सादर करण्यांत येत आहेत. |
| १) आर.जी.च्या कोणकोणत्या जागा महापालिकेतील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने हस्तांतरीत झालेल्या आहेत? जर असेल तर त्या कोणत्या? कोणत्या आर.जी. जागेवर महापालिकेमार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. |
| अ) आर.जी. मध्ये फेरबदल करण्यांत येऊ शकतो का? तसेच या अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/३१४९/२००७-०८,दि.१२/१२/२००७ व पत्र क्र. एस.एस.बी.-२००७/३१३, दि. १८/१२/२००७ या पत्रांचा खुलासा देण्यात यावा. |
| ब) फेरबदल करण्यांत आला असेल तर तो कोणत्या नियमाने करण्यांत आला? |
| क) विकासकर्तांने मंजुर नकाशाचे उल्लंघन केले असेल तर अशा विकासकर्तावर आपण कोणती |

| |
|---|
| कार्यवाही करतो? |
| ड) मिरा भाईंदर महानगरपरलिका आरक्षित जागेच्या मंजूर नकरशाच्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्याच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना आपण त्याच्या दुसऱ्या प्लॅनला मंजूरी देऊ शकतो का? |
| इ) आर.जी. आरक्षित जागेवर प्लॅन व्यतिरिक्त काम मंजूर करु शकतो का? मंजूर केलयास कोणतया अधिनियमाने करु शकतो? ह्याचा खुलासा करावा. |
| ई) मी दिलेल्या दि. १०/०५/२०१३ च्या पत्रान्वये मिरारोड (पूर्व) मधील कोणत्या आरक्षित आर.जी. जागा व मोकळी जागा (ओपन स्पेस) कोठे कोठे वापरण्यात आलेल्या आहेत त्याचा सविस्तर खुलासा करावा. |
| **३८ श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ प्रकरण क्र. ७४, ठराव क्र. ७१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे या बहुमताने मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेने सदर विषयाबाबत काय कारवाई केलेली आहे? |
| **३९ सौ. निलम ढवण मा. सदस्या यांनी दि. ०८/०१/२०१५ रोजी विचारलेला प्रश्न** |
| दि. २५/११/२०१४ रोजीच्या महासभेमध्ये अनधिकृत बांधकाम व त्यावील कारवाई या संदर्भात केलेल्या कामचुकारपणा व योग्य कारवाई न केल्यामुळे केलेल्या ठरावाबाबत. |
| १) श्री. श्रीकृष्ण माहिते यांचे निलंबन केले का? |
| अ) श्री. श्रीकृष्ण माहिते यांचे निलंबन न केल्यास ते का केले नाही? याचे कारण स्पष्ट करावे. |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २८/६/२०१६

## सार्व. आरोग्य विभाग

## // सुधारीत गोषवारा //

**प्रकरण क्र. ०२ :-** **पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.**

महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५५ कच्चे पक्के नाले सफाई करण्यासाठी दरवर्षी विविध यंत्रासामुग्री व वाहने, मनुष्यबळ इत्यादी भाडयाने घेवून कामे करण्यात येत असतात. सदर कामावर दरवर्षी सुमारे दिड कोटी पेक्षा जादा खर्च येत असतो. मात्र दि. १९/३/२०१६ रोजीच्या मा. विशेष महासभा, ठराव क्र. १४३ अन्वये सन २०१६-१७ या वर्षात रु. ५० लक्ष खर्चाच्या मर्यादेत मनपा क्षेत्रातील नाले सफाई करणे बाबतचा ठराव पारित केलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने सार्व.आरोग्य विभागाने मनुष्यबळ, विविध यंत्रसामुग्री भाड्याने घेणेबाबत निविदा मागवून मा. स्थायी समिती सभा दि. १३/५/२०१६ ठराव क्र. ०७ अन्वये मंजूर निविदाकाराकडून आवश्यकतेनुसार यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करून नाले सफाईच्या कामास दि. १४/५/२०१६ पासुन सुरूवात करण्यात आली असुन बहुतांशी नाले सफाईचे काम झालेले आहे.

एकात्मिक नाले बाधणी प्रकल्पा अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश नाले पक्के मोठे, खोल, रुंद तसेच बंधिस्त स्वरूपाचे बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदरचे नाले जे.सी.बी., पोकलन, इत्यादी यंत्रासामुग्रीमार्फत सफाई करणे शक्य होत नसल्याने, सदरचे नाले सफाई करणेकामी मनुष्यबळाचा वापर करून नाल्यामध्ये उतरून गाळ/माती/कचरा काढुन नाले सफाईची कामे करण्यात आली.

शहरातील बहुतांश नाल्यांलगत अरुंद रस्ते असल्याने त्या ठिकाणी गाळा/माती/ कचरा वाहतुक करणे कामी वाहने घेऊन जाणे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे रेल्व हद्दीतील भाईंदर ते मिरारोड जाफरी खाडी पर्यंत रेल्वेने संरक्षण भिंत बांधली असल्याने या नाल्यातील निघालेला गाळ/माती मनुष्यबळाद्वारे उचलून रस्त्यावर गोळा करून तद्नंतर वाहनात भरून वाहतुक करण्यात आला. त्यामुळे याकामासाठी मोठ्याप्रमाणावर मनुष्यबळाचा वापर करावा लागला आहे.

महाराष्ट्र शासन दि. २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्था या अधिसूचित रोजगाराचे किमान वेतन पुर्नःनिर्धारित दरानुसार नाले सफाई कामाच्या निविदेतील मजुरांचे दर मागील वर्षापेक्षा वाढीव दर आहेत.

वरील बाबी विचारात घेता नाले सफाई कामावर अंदाजे रू. २.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास मा. महासभेची कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

२४/०६/१६

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Sudharit Goshwara Nale safsafai - 2016-17.docx

गोषवारा प्राप्त दि. २७/०६/२०१६ वेळ ०२.५० pm

~~क्र. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. २९

27/6/2016.

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.०७/०५/२०१६
## सार्व. आरोग्य विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. :- ०२ पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेबाबत.**

महानगरपालिका क्षेत्रातील एकूण १५५ कच्चे पक्के नाले सफाई करण्यासाठी दरवर्षी विविध यंत्रासामुग्री व वाहने, मनुष्यबळ इत्यादी भाडयाने घेवून कामे करण्यात येत असतात. सदर कामावर दरवर्षी सुमारे दिड कोटी पेक्षा जादा खर्च येत असतो. मात्र दि. १९/३/२०१६ रोजीच्या मा. विशेष महासभा, ठराव क्र. १४३ अन्वये सन २०१६-१७ या वर्षात रु. ५० लक्ष खर्चाच्या मर्यादेत मनपा.क्षेत्रातील नाले सफाई करणे बाबतचा ठराव पारित केलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने सार्व.आरोग्य विभागाने मनुष्यबळ, विविध यंत्रसामुग्री भाड्याने घेणेबाबत निविदा मागवून दर मंजुर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.

मनपा. क्षेत्रातील मोठ्या नाल्यांची लांबी, रूंदी व संख्या त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्र खाडीलगत असल्याने अतिवृष्टीच्या वेळी सखल भागात पावसाचे पाणी शिरून नागरी वस्तीत गैरसोय होऊ नये. यादृष्टीने शहरातील एकुण १५५ कच्चे पक्के नाले समाधानकारकरित्या मुदतीत साफसफाईची कामे रू.५० लक्ष च्या मर्यादेत करणे अशक्य आहे.

मनपा. क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाईची कामे सार्व.बांधकाम विभागामार्फत करण्याबाबत मा. आयुक्त सो., यांच्या समवेत चर्चा झाली असता, सदरची कामे ब्रास / क्युबीक मीटर पध्दतीने केल्यास या कामावर अंदाजे किमान ४ ते ५ कोटी रूपये खर्च येईल, याबाबत चर्चा झाली. याकरिता दरवर्षी प्रमाणे भाडे तत्वावर यंत्रासामुग्रीच्या निविदा मागवून सदरची कामे सार्व. आरोग्य विभागामार्फत करण्यात यावी, अशी मा. आयुक्त सो., यांनी सुचित केले.

महानगरपालिका क्षेत्रातील बहुतांश मोठे नाले पक्क्या स्वरूपाचे खोल व रुंद बांधण्यात आलेले आहेत. सदरचे नाले सफाई जे.सी.बी., पोकलन मशीनमार्फत सफाई करणे शक्य होणार नाहीत. त्यामुळे याकामी मनुष्यबळाचा वापर मोठ्याप्रमाणवर करावा लागणार आहे. सध्या मजुरांच्या किमान वेतनात वाढ झाल्याने मजुरांना मागील वर्षी पेक्षा जादा वेतन अदा करणे अनिवार्य आहे.

पावसाळ्यापुर्वी शहरातील कच्चे पक्के नाले सफाईची कामे समाधाकारके न झाल्यास पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचुन नागरीकांची गैरसोय होऊन वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता शहरातील नाले सफाईची व सुमारे १७ ठिकाणी अती सखल भागातील पावसाचे पाण्याचा उपसा सक्शन मशीनद्वारे करणे अत्याआवश्यक आहे.

वरील सर्व बाबींचे गांभीर्य लक्षात घेवून मा. विशेष महासभेने नाले सफाई व तत्सम कामासाठी रू. ५० लक्ष ची मर्यादेत करण्याबाबत ठराव पारित केला असून या खर्चाच्या मर्यादेत शहरातील नाले सफाई व पावसाळ्या दरम्यान अतिसखल भागातील पाण्याचा उपसा करण्याची कामे समाधानकारक करणे शक्य होणार नाही. परिणामी पावसाळ्यात शहरात ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचुन नारगीकांची गैरसोय व वित्तहानी झाल्यास लोकप्रक्षोभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शहरातील नाले सफाई व तत्सम कामाकरीता दि. १९/३/२०१६ रोजीच्या मा. विशेष महासभेने मर्यादित केलेल्या रू.५० लक्ष ची मर्यादा रू. १.५० कोटी नाले सफाई व ५०.०० लक्ष सक्शन पंप भाडयाने घेणे कामी वाढ करणेस मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

(अच्युत हांगे)
आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका
२५/४/१६

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nale safsafai - 2016-17.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०५ /२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र ( 03 ) :- जलसंपदा विभागाच्या भातसा धरणातून २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण मिरा भाईंदर शहरास मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर शहर हे मुंबई व ठाणे लगत असल्याने व्यवसाय व कामानिमीत्ताने मोठया प्रमाणात जनता वास्तव्यास येत आहे. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात म्हाडा व मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत गृहसंकुले बांधण्यात आलेली आहेत व प्रस्तावीत आहेत. नियमाप्रमाणे सदर संकुलांना मुलभूत सुविधा अंतर्गत पाणी पुरवठा देणे अपरिहार्य आहे.

मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार ८.१४ लक्ष इतकी असून सध्याची लोकसंख्या अंदाजे ९.५१ लक्ष असून पाण्याची मागणी १७२ द.ल.लि. प्रति दिन आहे. मिरा-भाईंदर शहरास स्टेम वॉटर डिस्ट्रीब्युशन ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रा.लि. कडून दररोज ८६.०० द.ल.लि. व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सरासरी ५० द.ल.लि. असा एकूण सरासरी १३६ द.ल.लि. पाणी पुरवठा मंजूर आहे. सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा आवश्यक असलेल्या पाणी पुरवठ्यापेक्षा ३६ द.ल.लि. कमी होत आहे. राज्य शासनाच्या नगरोत्थान अभियानांतर्गत ७५ द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरास मंजूर करण्यात आलेले आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर मिरा भाईंदर शहरास एकूण २११ द.ल.ली. पाणी उपलब्ध होणार आहे.

मात्र पुढील पाच वर्षाच्या लोकसंख्येचा विचार करता सन २०२१ ची शहराची पाण्याची मागणी सुमारे २३५ द.ल.ली. इतकी असणार आहे. त्यामुळे सदर लोकसंख्येची पाण्याची गरज भागविण्याकरिता अजून २५ द.ल.ली. पाणी पुढील पाच वर्षात कमी पडणार आहे. सदर कमी असणाऱ्या पाणी पुरवठयाची आरक्षणाची गरज आहे.

सद्यस्थितीत जलसंपदा विभागाच्या मालकीच्या भातसा धरणाच्या खालीलबाजूस मौजे पिसे येथे असलेल्या बंधाऱ्यातून ठाणे महानगरपालिका सुमारे २०० द.ल.ली. पाणी घेत असून त्यांची सद्याची अस्थित्वातील असलेल्या योजनेतून २५ ते ५० द.ल.ली. पाणी घेण्यास तांत्रिक दृष्टया पुरक आहे.

(९)

सबब मिरा भाईंदर शहराकरिता जलसंपदा विभागाच्या मालकीच्या भातसा धरणाच्या खालील बाजूस पिसे येथील बंधाऱ्यातून २५ द.ल.ली पाणी आरक्षण मिळाल्यास सदरचे आरक्षण ठाणे महानगरपालिकेस वळतेकरुन ठाणे महानगरपालिकेचे स्टेम प्राधिकारणाकडे असलेल्या पाण्याच्या आरक्षणापैकी २५ द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरासाठी स्टेम प्राधिकरणकडून उपलब्ध होईल. अशाप्रकारे स्टेम प्राधिकरणाकडून मिरा भाईंदर शहरासाठी एकूण ८६ + २५ = १११ द.ल.ली. पाणी उपलब्ध होईल व सदरचे पाणी वहन करण्यासाठी सद्याची अस्तित्वातील असलेली योजना तांत्रिक दृष्टया पुरक असल्याने कोणत्याही प्रकाराचे जादाचे काम करण्याची आवश्यकता नाही.

तरी शहराची सन २०२१ ची पाण्याची मागणी पुर्ण करण्यासाठी भातसा धरणातून मिरा भाईंदर शहरासाठी २५ द.ल.ली. पाण्याचे आरक्षण उपलब्ध करुन घेण्याबाबत जलसंपदा विभागाकडे प्रस्ताव सादर करणेकामी मा.महासभेची प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि :-०७/०५/२०१६

॥ गोषवारा ॥

प्रकरण क्र-:-०४

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन दि.३० सप्टेंबर २०१५ च्या पटसंख्येनुसार इ. १ली ते इ.८वी पर्यंत एकुण ८८४८ विदयार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे ९७३३ पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वहया, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विदयार्थी-विदयार्थीनींना सदर धोरणानुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात अ.क्र ४) शालेय गणवेश,बॅच,टाय,पीटी युनिफॉम संकेतांक (२५३४) रु. १,००,०००,००/-, अ.क्र ५) शालेय वहया व इतर साहित्य संकेतांक (२५३४) रु. ३५,००,०००/-, व अ.क्र ६) शालेय दप्तरे,बुट मोजे,वॉटर बॉटल संकेतांक (२५३४) रु. ८०,००,०००/- प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता शिफारस करण्यांत येत आहे. सदर खरेदी करण्यास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी करिता सविनय सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
०२/०५/१६

गोपवारा प्राप्त दि. ४/ ४/२०१५ वेळ २:३०
मा. ~~स्थायी समिती~~ / कामकाज गोपवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 02
४/४/१५
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

## मा. महासभा दि.०७/०५/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ०५ )** :- भाईंदर (पूर्व) नवघर येथे जेट्टी बांधणे कामाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथे विसर्जन धक्का असून सदर ठिकाणी भाईंदर (पूर्व), मिरारोड, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८, दहिसर भागातील श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन होत असते, त्यामुळे सदर धक्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असते. सदर धक्का खाडीपर्यंत वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे सदर गर्दी व वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मिरारोड (पूर्व), दहिसर, राष्ट्रीय महामार्ग क्र.८, प्रभाग क्र.३१ मधील श्रीगणेश विसर्जन साठी कनकिया भागात खाडी किनारी नविन विसर्जन धक्का बांधणें आवश्यक झाले आहे.

भाईंदर (पूर्व) नवघर व एल.एन. तिवारी कॉलेज समोर कनकिया भागाच्या पर्यटनाच्या दृष्टीने व जलवाहतुकीच्या दृष्टीने विकास करण्यासाठी (विविध उपक्रम राबविणे, जेट्टी विकसित करणे) पर्यटन संचनालय, महाराष्ट्र शासन यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन पर्यटन विभागास सादर करण्यास कळविलेले आहे. सदर कामाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व पर्यटन विभागामार्फत संयुक्त पहाणी करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मुंबई यांचे दि.१५/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये भाईंदर (पूर्व) नवघर येथे जेट्टी उभारणे बाबत सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे सदर पत्रासोबत जोडून पाठविले आहे. सदर कामी रु.१६,४८,४६,८८२/- एवढा खर्च अपेक्षित आहे. वरील कामास मा. महासभा दि.३०/०१/२०१६ ठराव क्र.११२ अन्वये सदर कामी धक्का व रस्ता विकास योजनेत दर्शविणे, रस्ता तयार करणे, सी.आर.झेड. प्राधिकरणाची मान्यता घेणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास पाठविणे, जागा संपादन करणे इ. कामे करण्यासाठी, प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात आली आहे, त्यानुसार सदर विभागास कळविलेले आहे.

वरील कामी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात "चौपाटी तयार करणे (नवघर/ घोडबंदर/ कनकिया)" या लेखाशिर्षकात रु.३,५०,००,०००/- एवढी तरतुद करण्यात आलेली असून सदर तरतुद ही अत्यंत कमी आहे. मेरीटाईम बोर्ड यांनी रु.१६,४८,४६,८८२/- एवढी रक्कम जमा करणेस, महानगरपालिकेस कळविलेले आहे. महानगरपालिकेच्या स्वतःचे उत्पन्नातुन एकाच वेळी १६.४८ कोटी रुपये खर्च करणे शक्य होणार नाही. तरी कृपया शासनाकडे अनुदान मागविणे उचित राहील. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात उपलब्ध असलेल्या रु.३.५० कोटी रकमेतुन जैसलपार्क चौपाटी, घोडबंदर, कनकिया जेटीचा देखील समावेश आहे. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2016-17/DK/MG-2

गोपवारा प्राप्त दि. २०.०४.२०१६ वेळ ०२:५० वा.

~~मा. स्थायी समि~~... द्वारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ०९

कार्यालय

नगरसचिव विभाग.

(७)

# मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. महासभा दि.०७/०५/२०१६

// बांधकाम विभाग //

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ०६ )**:- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख रस्ते सिमेंट कॉक्रीटचे तयार करणेबाबत....

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्याखालून विविध सेवा वाहीन्यांचे जाळे पसरलेले असून सद्यस्थितीत मलवाहीन्या, विद्युत वाहीन्या, गॅस वाहीन्या, इंटरनेट, दुरध्वनी वाहीन्याची कामे जवळजवळ पुर्ण होत आली आहेत. पाणीपूरवठा योजनेतंर्गत जलवाहीन्या टाकण्याची कामे देखिल प्रगतीपथावर असून शहरातील प्रमुख रस्ते हे सिमेंट कॉक्रीटचे घेण्यासाठी मा.महासभा दि.३०/०३/२०१५ ठराव क्र.९२ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी प्रथम टप्यात रु.९८,०६,१५,३५०/- रक्कमेच्या प्रकल्प खालील पॅटर्नमध्ये शासनाकडे सादर करण्यात आला होता.

| | | |
|---|---|---|
| राज्य शासन अनुदान ३३% | - | रु. ३२,३६,०३,०६६/- |
| शासकीय/ निमशासकीय संस्थेकडून कर्ज ३३% | - | रु. ३२,३६,०३,०६६/- |
| महानगरपालिका निधी (३४%) | - | रु. ३३,३४,०९,२१८/- |
| **एकूण** | - | **रु. ९८,०६,१५,३५०/-** |

मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दि.०४ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावा बाबत चर्चा करण्यात आली, तथापी सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या इतर प्रकल्पांना प्राधान्य दिल्याने सिमेंट कॉक्रीटचे रस्ते तयार करणेचा प्रकल्प मंजूर होऊ शकणार नाही.

छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमीरा रोड) तीन उन्नत मार्ग बांधणेसाठी मा.महासभा दि.२३/०३/२०१५ ठराव क्र.८१ अन्वये प्रशासकीय आर्थिक मान्यता तसेच कर्ज घेण्यास देखिल मान्यता प्राप्त असून शासनाने रु.२५६ कोटी कर्ज उपलब्ध करण्यास मान्यता दिली आहे. तथापी सदर उन्नत मार्ग बांधण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधितुन घेण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या पाठपूराव्या नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सदर प्रकल्प हाती घेण्यास तत्वतः मंजूरी मिळालेली आहे. त्यामुळे सदर कामाचा भार महानगरपालिकेवर येणार नाही. सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र.७० अन्वये मान्यता दिलेल्या खालील रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटचे करणेच्या कामासाठी शासनाकडून कर्ज घेऊन सदर कामे करणे योग्य होईल.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) येथील एस.के. स्टोन ते मिरारोड स्टेशन पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| २ | मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमीरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ आणि सनराईज ते नाईट मिटींग पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,३९,६२,७५०/- |
| ३ | भाईंदर (पूर्व) येथील गोल्डन नेस्ट रोडवरील गोल्डन नेस्ट पोलिस चौकी ते हनुमान मंदिरा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,४५,२२,८५०/- |
| ४ | भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओस्तवाल ऑनेक्स पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९८,६५,४००/- |
| ५ | भाईंदर (प) येथील वालचंद्र प्लाझा ते अरिहंत दर्शन (९० फुटी रोड) पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,७८,२०,०५०/- |
| ६ | भाईंदर (प) येथील बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुटी रोड) रस्ता | रु.७,८७,२४,६००/- |

| | | |
|---|---|---|
| | कॉक्रीटीकरण करणे. | |
| ७ | भाईंदर (प.) जर्नादन रकवी मार्ग कॉक्रीट करण करणे | रु.५,१४,५१,८००/- |
| ८ | भाईंदर (प.) उड्डाणपुल समांतर रस्ता आय.डी.बी.आय बँक ते मॅक्सेस पोलीस चौकी व पुढे टेंबा हॉस्पीटल पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.५,७९,४९,१५०/- |
| ९ | मिरारोड (पूर्व) सिल्व्हरपार्क रस्ता सृष्टी पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.१८,४१,२४,२००/- |
| १० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सर्कल ते कुणाल शॉपिंग सेंटर (नयानगर पोलिस चौकी) व पुढे नरेंद्र पार्क ते हैदरीचौक पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,५२,३८,६००/- |
| ११ | मिरारोड (पूर्व) नरेंद्र पार्क ते उड्डाणपुला पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.८,७५,३९,४५०/- |
| १२ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल ते सेव्हन ईलेव्हन हॉस्पीटल रस्ता पर्यत कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,९६,५५,५००/- |
| १३ | घोडबंदर रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.४२,९२,०९,४००/- |
| १४ | मिरारोड (पूर्व) उमाकांत मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिज पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.३,५२,९२,३००/- |
| १५ | मिरारोड (पूर्व) साईबाबा नगर ते शितल नगर पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१४,८२,५९,५००/- |
| १६ | मिरारोड स्टेशन शांतीशॉपिंग सेंटर ते भक्ती वेंन्दांत पर्यतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.२६,३२,८२,१००/- |
| १७ | हटकेश उदयोग नगर मधील सालासर इमारत ते शांती विद्यानगरी पर्यता रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१०,१८,८९,३५०/- |
| १८ | मिरारोड (पूर्व) कनकिया रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१९,८३,१६,०००/- |
| | **एकूण** | **रु.२१६,१२,२७,२००/-** |

वरील कामांसाठी शासकीय/ निमशासकीय संस्था / बँका यांच्याकडून कर्ज घेण्यासाठी व आवश्यक प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

PC-2/16-17/DK/MS/MG-1

गोषवारा प्राप्त दि. १३/०७/२०१६ वेळ .0.2.: ५०१५

मा. ~~स्थायी समिती~~ / ~~महासभा गोषवारा~~

नोंद रजिस्टर अ. क्र. ~~06~~ 26

लिपीक

नगरसचिव विभाग.

नगररचना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०७/०५/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्र (०८) - पोलीस आयुक्तालयासाठी जागा आरक्षित करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर विकास योजनेमधील आ.क्र. ९४, २६१, २८०, २९९, ३३१, ३३४, ३३५ व ३६४ या आरक्षणाचे नाव बदलून मार्केट याप्रमाणे आरक्षणाचे नाव करणेबाबत दि.३०/०७/२०१० रोजी मा. महासभेने ठराव क्र. ३४ अन्वये मंजूरी दिलेली असून सदर मंजूरीप्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/नर/३४५४/२०१०-११, दि.२१/१२/२०१० अन्वये मंजूरीसाठी सादर करणेत येवून दि.१६/०९/२०११ अन्वये फेरविनंती करणेत आलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या समस्यांबाबत स्थानिक आमदार मा.श्री. नरेंद्र मेहता यांनी आयोजित केलेल्या मा. मुख्यमंत्री महोदय यांचे समवेत दि.०४/०४/२०१६ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान मा. मुख्य मंत्री महोदयांनी मिरा भाईंदर शहरासाठी पोलीस आयुक्तालय देण्याचे तत्वतः मान्य केलेले असून प्रस्तावित पोलीस आयुक्तलयासाठी मा. पोलीस अधिक्षक यांचे समवेत मा. महापौर व मा.आमदार श्री. नरेंद्र मेहता यांनी दि.१८/०४/२०१६ रोजी पाहणी करुन मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्कमधील आ.क्र. ३३१, ३३२, ३३३, ३३४ व ३३५ या आरक्षणाने बाधीत जागेसाठी पसंती दर्शविलेली आहे.

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मिरारोड (पुर्व) येथिल प्लेझेंट पार्क या परिसरामध्ये मौजे मिरा, स.क्र. ३३(१६२)/पैकी, ५१(१८३)/पैकी, १५(१४४)/पैकी, १४(१४३)/पैकी, १६(१४५)/पैकी या जागेमध्ये विविध वापराची खालीलप्रमाणेची आरक्षणे दर्शविलेली असून सदर आरक्षणाचे प्रयोजन मंजूर विकास योजनेप्रमाणेचे एकूण क्षेत्र व महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजने प्रमाणे आरक्षणाचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | मनपाच्या ताब्यातील क्षेत्र (चौ.मी.) | ताब्यात आलेल्या जागेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ३४२८.२४ | ६८.५६% |
| २ | ३३२ | दवाखाना व प्रसुतिगृह | २३०० | २३५७.०० | १००% |
| ३ | ३३३ | मार्केट | २००० | ५९६.४८ | २९.८२% |
| ४ | ३३४ | माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान | १३००० | ३९६७.६० | ३०.५२% |
| ५ | ३३५ | बगीचा | ७८०० | २६५९.०० | ३४.०९% |

(2)

सदरचा परिसर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे या भागामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे कार्यालय झाल्यास शहरामधील जनतेला त्याचा निश्चितपणे फायदा होईल.

यास्तव दि.३०/०७/२०१० रोजी महासभेने ठराव क्र. ३४ अन्वये मंजूर केलेल्या फेरबदलामधील आ.क्र. ३३१, ३३४, ३३५ या आरक्षणाच्या मर्यादित फेरबदल रद्द करणे आवश्यक असून त्याप्रमाणे शासनास माहिती सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर परिसरामध्ये आ.क्र. ३२८ हे माध्यमिक शाळा व खेळाच मैदानासाठी तसेच आ.क्र. ३२७ व आ.क्र. ३३६ हे प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित असल्यामुळे तसेच या भागामध्ये डॉन बॉस्को स्कूल, रॉयल कॉलेज, दालमिया कॉलेज हे विद्यमान शाळा व कॉलेज आहेत. यास्तव वरिल तक्त्यामधील आ.क्र. ३३४ "माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान" हे आरक्षण वगळून त्याठिकाणी मा. पोलीस आयुक्त कार्यालयासाठी आरक्षण दर्शवून तसेच या परिसरात विद्यमान भक्ती वेदान्त हॉस्पीटल असून रॉयल कॉलेज जवळ आ.क्र. ३३८ हे डिस्पेंसरी व मॅटर्निटी होम हे आरक्षण विकास योजनेमध्ये दर्शविलेले आहे. तसेच या व्यतिरिक्त या भागामध्ये खाजगी दवाखाने अस्तित्वात असल्यामुळे तसेच मिरा भाईंदर शहरामध्ये विकास योजना रस्त्याच्या रुंदीकरणाने बाधीत होणा-या दुकानांसाठी व फेरीवाले यांच्या पुर्नःवसनासाठी मार्केट च्या जागांची आवश्यकता असल्यामुळे आ.क्र. ३३२ (डिस्पेंसरी व मॅटर्निटी होम) हे आरक्षण वगळून आ.क्र. ३३२ व आ.क्र. ३३३ ही आरक्षणे एकत्रित करुन मार्केट साठी आरक्षित ठेवून इतर आरक्षणाच्या आखणीमध्ये फेरबदल प्रस्तावित करता येईल.

वरीलप्रमाणे फेरबदल करावयाचे ठरल्यास खालीलप्रमाणे आरक्षणे व त्यांचे क्षेत्र प्रस्तावित होईल.

| अ.क्र. | आ.क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | विकास योजनेचे एकूण क्षेत्र (चौ.मी.) | फेरबदला प्रमाणे प्रस्तावित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | ३३१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | ५००० | ५४८९ |
| २ | ३३३ | मार्केट | २००० + २३०० | ४८२७ |
| ३ | ३३४ | पोलीस आयुक्तालय | ---- | ११८१५ |
| ४ | ३३५ | बगीचा | ७८०० | ७८९६ |

सबब महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
27/01/16

99 Maha 16



# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०५ /२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (०९) - सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरासंबंधीची तरतुद मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यामधील नागरी भागाचे रहिवास, वाणिज्य व औद्योगिक वापरासाठी वेगाने विकसन सुरु असून वाढती लोकसंख्या व पाण्याचे स्त्रोत यांचे प्रमाण व्यस्त असल्यामुळे नागरी भागामध्ये मोठ्या प्रमाणात सांडपाणी तयार होवून ह्यामध्ये रासायनिक व विषारी घटकांचा समावेश असल्याची शक्यता असते. यास्तव सदरचे सांडपाणी प्रक्रिया न करता शहरामधील मलनिस्सारण वाहिन्यांमध्ये सोडणे योग्य नसल्यामुळे व त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकत असल्यामुळे याबाबतची तरतूद बृहन्मुंबई व नागपूर महानगरपालिका वगळता राज्यातील ईतर महानगरपालिकासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये सामाविष्ठ करणेसाठीची कार्यवाही करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणे बाबत शासनाने कलम १५४ अन्वये निर्देश दिलेले आहेत. तसेच सदरच्या तरतूदीसाठी संदर्भिय पत्रासोबत परिशिष्ठ देण्यात आलेले आहे.

सदरच्या परिशिष्ठाप्रमाणे शहरामधील ४००० चौ.मी. किंवा त्यापेक्षा जास्तीच्या क्षेत्राच्या भूखंडामध्ये नव्याने होणा-या विकासकासाठी / पुर्नविकासासाठीच्या गृहप्रकल्पासाठी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करावयाची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**Regulations for Waste Water Treatment & Recycling :**

**A. TYPES OF WASTE WATER**

1) Black Water : It means waste water from W.C. urinals and M.S.W.

2) Grey Water : It means waste water from bathrooms, sinks and wash areas

3) Apart from residential waste water, Waste water generated from industrial, medical, commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

**B. APPLICABILITY**

These regulations shall be applicable to all developments / redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq.m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval / building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation, etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupations of the respective building.

**C. REGULATIONS**

**(C-1) For layout approval / building permission**

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq.m. (1 acre) of more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc. and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc.

III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked an different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation / Council / Approving authority.

IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporation / Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner / developer at his own cost.

V. A clause must be included by the owner / developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises / organization or society of the purchasers shall ensure that.

a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent Authority / EHO of the respective Ward Office.

b. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled, Copy of any such recommendation and necessary action taken shall be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

**(C-2) Grout Housing / Apartment Building**

i. In case of group housing if the built-up area is 2000 sq.m. or above or if consumption of water is 20,000 lit / day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial, Government, Semi-government organization, hotels, lodging, etc.**

i. For all buildings in this category having a build-up area of 1500 sq.m. or more and if water consumption is 20,000 lit / day or more, then provision for waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

i. All hospitals having 40 or more beds, must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1)

**(C-5) Vehicle Servicing Garages**

i. All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehilcles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

i. All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

i. Any owner / developer / organization / society violating the provisions of these bye-laws shall be fined Rs.2500/- on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100/- for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

ii. If the results of test as mentioned in (C-1 v. a. b.) are not satisfactory, then the concerned owner / developer / organization / society shall be charged a penalty of Rs.300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

सबब शासनाच्या निर्देशाप्रमाणे वरिलप्रमाणेची तरतूद मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली सामाविष्ठ करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेसाठी निर्णय होणेस मा. महासभेसमोर सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २८/०३/२०१६ वेळ ०५.०५ वा.
~~मा. स्थायी समिती~~ / [illegible] गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २९
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०७/०५/ २०१६

(१)

### ।।गोषवारा।।

प्रकरण क्र. ९०: महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर संबंधित कामे करण्यासाठी खाजगी संस्थेकडुन निविदा मागविणे बाबत.

मिरा भाईदर महानगरपालिका विविध ठिकाणी अनेक मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे. त्यापैकी बहुतांश मोबाईल टॉवर यांना मालमत्ता कराची कर आकारणी करण्यात आली आहे. तथापी काही मोबाईल टॉवर यांना कर आकारणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्याकरीता संबंधित आस्थापनांनी महानगरपालिकेकडुन परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्याकरिता संबंधित आस्थापनांनी महानगरपालिकेकडून परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कर आकारणी तसेच परवानगी यामध्ये तफ़ावत आली आहे.

तसेच बहुतांश मोबाईल टॉवर आस्थापनांनी परवानगी प्राप्त करुन घेण्याकरीता महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू परवानगी प्राप्त न झाल्याने कर विभागाने अशा मोबाईल टॉवर यांना अनधिकृत बांधकामावर लावावयाच्या शास्ती रक्कमेची आकारणि केली आहे. त्यामुळे सदर मोबाईल टॉवर आस्थापना यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल करुन निव्वळ कराचा भरणा करीत आहे त्यामुळे शास्ती रक्कम व त्यावरील व्याजाच्या रक्कमेत वाढ होऊन मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फ़ुगवटा निर्माण होत आहे. तसेच कर विभागातील कर्मचारी यांनी निवडणुका/ जनगणना व इतर कार्यालयीन कामाचे अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने महानगरपालिकाहद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे महानगरपालिका कर्मचा-यांमार्फ़त सर्व्हेक्षण करुन कराची वसुली करणेस अशक्य होत आहे.

महानगरपालिका हद्दीत विविध उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर यांचे सर्व्हेक्षण करणे,कर आकारणी झाली आहे किंवा नाही याची छाननी करणे, कर आकारणि न झाल्यास संबंधित आस्थापनेकडून कागदपत्राची मागणी करणे, मोबाईल टॉवर उभारणीकरीता परवानगी प्राप्त करुन घेणे तसेच परवानगी न घेता उभारलेल्या मोबाईल टॉवरला नियमित करुन घेणे याकरीता मे.सुमन इन्फ्रा. सर्विसेस यांनी दि.१७/१२/२०१५ रोजी अशा प्रकारची कामे करण्या इच्छूक असलेबाबत महानगरपालिकेस पत्र सादर केले आहे.

वरील बाबींचा विचार करुन महानगरपालिका हद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे सर्व्हेक्षण करणे,सदर मोबाईल टॉवर यांना परवानगी आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, परवानगी नसल्यास संबंधित मोबाईल टॉवर आस्थापना यांचेशी समन्वय साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता

करून राज्य शासनाच्या धोरणानुसार परवानगी प्राप्त करून घेणे, नियमाकुल परवानगी देणेस शक्य नसल्यास टॉवर निष्कासित करणेकामी अतिक्रमण विभागास सुचित करणे, आवश्यक परवानगी शुल्काचा भरणा करून घेणे, परवानगी प्राप्त करून घेतले नंतर कर विभागाशी समन्वय साधून मालमत्ता कर आकारणि करून घेणे व कर वसुली करून देणे इत्यादी कामाचा निपटारा जलदगतीने झाल्यास मोबाईल टॉवरच्या परवानगी शुल्क व मालमत्ता कराच्या वसुली रक्कमेत वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणेस शक्य होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरचे सर्व्हेक्षण, परवानगी, निर्मितीकरण, कर आकारणी व वसुली करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६(अ) व ७३ नुसार अभिकर्ता नियुक्त करणेकामी प्रस्ताव मा.महासभेसमोर मान्यतेस्तव सादर.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. [illegible]/3/२०१८ वेळ [illegible]:४५
मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २७

सही
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

(१)

## बांधकाम विभाग

मा. महासभा दि.०७/०५/२०१६

// गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ९१ ) :-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेचे ठिकाण स्थलांतरीत करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) येथे जुन्या रेल्वे फाटकाजवळील वाहतुक बेटात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामास मा. महासभा दि.१३/०४/२०१५ ठराव क्र.०५ अन्वये मान्यता प्राप्त असून सदर मान्यतेनुसार परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे पाठविण्यात आला होता. सदर समितीच्या मान्यतेने मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत सदर प्रस्ताव दि.०४/१२/२०१० रोजी शासनाकडे पाठविण्यात आला. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दि.१५/०४/२०१११ रोजी सदर प्रस्तावास मान्यता दिली. तथापी सदर मान्यतेच्या पत्रात नगरविकास विभागाची मान्यता घेण्याची अट टाकली होती. त्यानुसार नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सदर प्रस्ताव पुनश्च सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित असून मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येत असून मान्यता अप्राप्त आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १० फुट उंचीचा पूर्णाकृती पुतळा तयार आहे.

दरम्यानच्या काळात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा भाईंदर (पूर्व) नवघर शाळेच्या समोरील जागेत बसविण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. सदर ठिकाणी भाईंदर (पश्चिम) रेल्वे फाटकाजवळील बसावायचा पुतळा स्थलांतरीत करावायाचा झाल्यास पुनश्च प्रस्ताव नव्याने गठीत झालेल्या मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे पाठवुन त्यांच्या शिफारसीवरुन शासनाची परवानगी घ्यावी लागेल. सदर वस्तुस्थिती पुढील निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2016-17/DK/MG-4

गोपवारा प्राप्त दि. २२/०७/२०१५ वेळ ०२:४० वा.
~~मा. स्थायी समिती~~ /महासभा पटवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ९९
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. 06/04 /2016

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.१२ :- उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागातील उद्याने,मैदाने,स्मशानभुमी,चौपाटया,नर्सरी,दुभाजक इ.ची दैनंदिन निगा व देखभाल करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरातील खालील मालमत्तांची उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत दैनंदिन निगा व देखभाल करणेकामी मजुर पुरवठा करून त्यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मालमत्तेचे वर्णन | संख्या |
|---|---|---|
| 1. | उद्याने | 60 |
| 2. | मैदाने | 11 |
| 3. | स्मशाने | 14 |
| 4. | दुभाजके | 16 कि.मी. लांबीचे |
| 5. | चौपाटया | 2 |
| 6. | नर्सरी | 1 |

वरील मालमत्तांच्या ठिकाणी मजुरामार्फत आवश्यकतेनुसार पाणी देणे, साफसफाई करणे, वाढलेले गवत काढणे, वृक्षाची छाटणी करणे, शोभिवंत फुलझाडे व गवत लावणे, शेणखत देणे, माती टाकणे सफेद रेती टाकणे, औषधे देणे, पाथवेची सफाई करणे इ.कामे करण्यात येत आहेत. यासाठी महानगरपालिकेमार्फत वार्षिक दराच्या निविदा मागवून कंत्राटदार नेमुण त्यांच्या मार्फत मजूर व हत्यारे,संसाधने,औषधे पुरवठा करून घेण्यात येत आहेत. सद्यस्थितीत दररोज 230 मजुर काम करीत आहेत. सद्यस्थितीत मजूर पुरवठा करणेसाठी नव्याने निविदा प्रासिध्द करण्यात आली आहे. सदर निविदेमध्ये कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी रक्कम नमुद करून नये म्हणजेच किमान वेतन कायद्यानुसार वेतन दणे बंधनकारक राहील, असे नमुद करून देखील एक निविदाकार वगळता इतर निविदाकारांनी किमान वेतनापेक्षा कमी दराने निविदा सादर केल्या आहेत. शासन नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-2016/प्र.क्र.24/नवि-20 दि. 22 जानेवारी 2016 नुसार शासनाने कामगारांना देण्यासाठी किमान वेतन दर निश्चित केलेले आहे. त्यानुसार वेतन दणे बंधनकारक असून कामगार कायदा 1977 चे कलम 21 नुसार कंत्राटदार किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन अदा करतात किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी Principal Employ म्हणून महानगरपालिकेची आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता किमान वेतन अदा करणे बंधनकारक करून मजुर पुरवठा करणेची निविदा मागविणे अथवा सर्व मालमत्तांच्या निगा व देखभालीची कामे क्षेत्रफळाच्या आधारे दर ठरवून कंत्राटदार नेमुन त्यांना निश्चित करून देणे. तसेच शहरातील दुभाजक, वाहतुकबेट, उदयाने व मैदाने देखभाल व दुरुस्तीसाठी शहरातील खाजगी/ सेवाभावी संस्था/ विकासक व अन्य संस्थांना आव्हान करुन दिल्यास महानगरपालिका निधिची बचत होईल. तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
28/3/16

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**
**मा. महासभा दि०८/०५/२०१६**

**//गोषवारा//**

**प्रकरण क्रमांक ( १३ ) :-** मिरारोड रेल्वेस्टेशन जवळील गांवदेवी नं. १ झोपडपट्टीतील डि.पी. रोडवर वसलेल्या झोपड्यांच्या व विकास योजनेतील रस्त्यावरील बाधितांच्या पुर्नवसनाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड रेल्वे स्टेशन जवळील रेल्वे समांतर गांवदेवी नगर नं.१ येथील १५.०० मीटर विकास योजनेतील रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सदर झोपडपट्टीतील डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपडीधारकाचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून डि.पी. रोड मध्ये बाधीत होणाऱ्या झोपड्याची संख्या ३६ आहे. या ३६ झोपडीधारकांपैकी ३० घरे व ०६ दुकाने आहेत. दिनांक.०१/०१/२००० अन्यथा त्यापूर्वीपासूनची झोपडी सध्या तेथे अस्तित्त्वात असल्याबद्दल कागदपत्रे तपासून पात्र किंवा अपात्र ठरविण्यात येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | घर/ दुकान | पात्र/ अपात्र |
|---|---|---|---|
| १ | नरेश नामदेव भोईर | घर | पात्र |
| २ | तारामती रमेश माछी | घर | पात्र |
| ३ | लक्ष्मी रोहिदास माछी | घर | पात्र |
| ४ | जगदीश प्रकाश माछी | घर | पात्र |
| ५ | गिरीश रोहिदास माछी | घर | पात्र |
| ६ | सुधिर पांडु पटेल | घर | पात्र |
| ७ | त्रिभवन नागीनभाई मिटना माछी | घर | पात्र |
| ८ | कुंदन नंदन माछी | घर | पात्र |
| ९ | आरती रोहिदास माछी | घर | पात्र |
| १० | रविंद्र ईश्वर माछी | घर | पात्र |
| ११ | मालती संतोष चौरसिया | घर | पात्र |
| १२ | चंदन सुंदर माछी | घर | पात्र |
| १३ | सोनल रमेश मृपाल | घर | पात्र |
| १४ | धनसुख अृमत माछी | घर | पात्र |
| १५ | आशा अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची पत्नी आहे) |
| १६ | विजय अशोक बिनिवाले | घर | अपात्र (अशोक पोकर सिंग बिनीवाले यांची अल्पवयीन मुलगा आहे) |
| १७ | रवि मनी पाटील | घर | पात्र |
| १८ | सुरेश मनी पाटील | घर | पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | मुक्ता मनी पाटील | घर | पात्र |
| २० | प्रेमा राजा मदेसिया | घर | पात्र |
| २१ | कमलेश दिपक माछी | घर | पात्र |
| २२ | जिगा प्रकाश माछी | घर | पात्र |
| २३ | अशोक पोकर सिंग बिनिवाले | घर | पात्र |
| २४ | बबन बाबर | घर | पात्र |
| २५ | मंजुलता शर्मा | घर | पात्र |
| २६ | भाविका जयेश माछी | घर | पात्र (तुलसी ईश्वर माछी (मृत) यांची नात) |
| २७ | फुलाबाई सुकार माछी | घर | पात्र |
| २८ | इंद्रजित सुधाशु रॉय | घर | पात्र |
| २९ | निलेश देवराम माछी | घर | पात्र |
| ३० | ईश्वर ताराजन मिटना माछी | घर | पात्र |
| ३१ | भारती महादेव भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थी अपात्र करण्यास येत आहे) |
| ३२ | शुभांगी नरेश भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३३ | मोहित नरेश भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २००१ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३४ | नरेश महादेव भोईर | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. परंतु गुमास्ता २०१५ चा असल्यामुळे लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |
| ३५ | राजा धनुशधारी मधेसिया | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करंण्यास येत आहे) |
| ३६ | जगदीश रमेश माछी | दुकान | अपात्र (गुमास्ता २००० पुर्वीचा बंधनकारक आहे. लाभार्थीस अपात्र करण्यास येत आहे) |

सदर विकास कामामध्ये येणाऱ्या झोपडीधारकांना पर्यायी सदनिका देवून सदर भाग खाली करणे गरजेचे आहे. बेघरांना घरे (House for Dishoused) अंतर्गत मौजे. नवघर येथील आ.क्र. २२२ व २२२-अ येथील इमारतीमध्ये २७ सदनिका उपलब्ध आहेत. तरी सदनिकांमध्ये डि.पी. रस्त्यामधील बाधीत लाभार्थींना स्थलांतरीत करावे लागेल. तरी सदर लाभार्थींना सर्व्हेक्षणाच्या व त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पात्र लाभार्थींना बेघरांना घरे या आरक्षणात प्राप्त असलेल्या १९.३३ चौ.मीटर क्षेत्राच्या सदनिका करारनामा करुन कायम स्वरुपी हस्तांतर करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

तसेच रस्ता रुंदीकरणामधील चामुंडा इमारत ते पांडुरंगवाडी / अजित पॅलेस ते सृष्टी / प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे येथील पात्र लाभार्थींना रेंटल हाऊसिंग स्किम मधील तात्पुरत्या स्वरुपात सदनिका देण्यात आलेल्या आहेत . सदर लाभार्थींना कायमस्वरुपी बेघरांना घरे या आरक्षणा अंतर्गत सदनिका देऊन पुर्नवसन करणे गरजेचे आहे. सदर पात्र लाभार्थ्यांची यादी खालील प्रमाणे:-

**चामुंडा इमारत ते पाडुरंग वाडी रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारे पात्र लाभार्थी**

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्रीम. कविता शनी वाघरी | पात्र |
| २ | श्रीम.कमुबाई देवजी वाघरी | पात्र |
| ३ | श्री.नाथा वाघरी | पात्र |

**अजित पॅलेस ते सृष्टी विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी**

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | श्री. अब्दुल अजिज अशीक अली कुरेशी | पात्र |
| २ | श्रीम. शारदा राजु अचन | पात्र |
| ३ | श्री. प्रकाश रजनराव सुर्वे | पात्र |
| ४ | सौ.वंदना सुभाष खिलारे | पात्र |
| ५ | श्रीम. साळुबाई नामदेव वाघमारे | पात्र |

**प्लेझंट पार्क ते मिरागाव ते हायवे पर्यंत विकास योजना रस्त्यामध्ये बाधीत होणारे पात्र लाभार्थी**

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | सौ.यशोदा भास्कर सुनिल | पात्र |
| २ | सौ.अनम्मा वर्गीस | पात्र |
| ३ | श्री.के. रामचंद्रन | पात्र |

सदर लाभार्थींना बेघरांना घरे (House for Dishoused) या आरक्षणात प्राप्त असलेले व भविष्यात उपलब्ध होणा-या सदनिका कायमस्वरुपी टप्याटप्याने हस्तांतरीत करणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2016-17/DK/MG-5

201/03E
- 2.40
o<

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

(१)

## मा. महासभा

सभा दि :-06/05/२०१६

।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. 98 -केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत.**

**संदर्भ :- १) नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. एन.यु.एल.एम.-२०१४/प्र.क्र.१०४/नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४**

**२) क्र.रानाउअ-२०१५/निवारा/सुचना/का-१६ नगरपरिषद प्रशासन संचालनालय शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३० दि.२०/०२/२०१५**

**३) मा. महासभा दि.३०/०१/२०१६ (दि.१८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा.महासभा) प्रकरण क्र.१४९, ठराव क्र.११५**

मिरा भाईंदर महानगरपालिका संदर्भ क्र.१ अन्वये "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. अभियानामध्ये शहरी बेघरांना निवारा हा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१९६/२००१ दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागातील बेघर व निराक्षित नागरीकांकरीता रात्र निवारे सुरु करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार शासनाने शहरी भागात रात्र निवारे कार्यान्वीत करणे, त्यांचे संचलन व देखभाल या विषयी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आलेली आहे. शहरी बेघर, निराक्षित, अल्पवयीन मुले असलेली निराधार स्त्री, वृध्द व्यक्ती, अपंग व्यक्ती, मानसिक विकलांग व्यक्ती इत्यादी नागरीकांना कायम स्वरुपी निवारा उपलब्ध करुन देणे हे या घटकाचे मुख्य उद्दीष्टय आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार खालील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

निवाऱ्यामध्ये अत्यावश्यक सोयी सुविधा जसे पाणी, वीज, स्वयंपाक करण्याची जागा तसेच स्वयंपाकासाठी आवश्यक उपकरणे, स्वच्छता स्नानगृहे, अग्निशमन व्यवस्था, प्राथमिक आरोग्य सुविधा, अंगावर घ्यावयाची पांघरुणे, अंथरण्याकरीता संतरज्या व इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच निवाऱ्यांची ठिकाणे शक्यतो रेल्व स्टेशन, बसडेपो, बाजार इत्यादी जवळ असावी, सदर निवारे निवासी, व्यापारी, औद्योगिक आणि सार्वजनिक वापरावयाच्या ठिकाणी असावीत.

निवाऱ्याचे व्यवस्थापन व दैनंदिन निगेचे काम संबंधित नागरी संस्था अथवा नागरी संस्थेने नियुक्त केलेल्या संस्था पाहु शकतील असे नमुद केलेले आहे. त्याअन्वये मा. अति. आयुक्त सो. यांच्या दि.०७/०५/२०१५ रोजीच्या मंजुरीनुसार दि.१४/०५/२०१५ रोजीच्या "दै. लोकमत" वृत्तपत्रातुन जाहिरात देवुन मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ०५ ठिकाणी बांधुन तयार असलेल्या निवाऱ्याच्या संचलन व व्यवस्थापनासाठी शासकीय व निमशासकीय नोदंणीकृत सामाजिक संस्थेकडुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीनुसार खालील ०६ संस्थाचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार दिनांक २०/०६/२०१५ रोजी मा. आयुक्त सो. यांची मंजुरी घेण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | उपलब्ध रात्र निवारे | **संचलन व देखभालीसाठी अर्ज प्राप्त झालेल्या संस्थेचे नाव** |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पु) खारीगांव शाळा इमारत, १ ला मजला | सिध्दीविनायक महिला बालकल्याण शिक्षण प्रसारक ट्रस्ट |
| २ | मिरा रोड, आरक्षण क्र.१८१, १ ला मजला | ओम साई समाज विकास संस्था |
| ३ | काशिगांव, आरक्षण क्र. ३१८, २ रा मजला | प्रज्वलीत ज्ञानदीप सामाजिक संस्था |
| ४ | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१,ॲमिनीटी स्पेस तळ व १ ला मजला, मिरा रोड(पु) | श्री हत्ता सामिलानी, मुंबई |
| | मौजे नवघर,स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१, ॲमिनीटी स्पेस २ रा मजला | जनजीवन सहारा सामाजिक फाऊंडेशन |
| ५ | अग्निशमन केंद्र, २ रा मजला, भाईंदर (प.) | निर्मराज आदिवासी महिला बालविकास संस्था |

उक्त नियुक्त संस्थानी निवाऱ्याकरीता १ पुर्णवेळ व्यवस्थापक, ३ काळजीवाहक(प्रत्येक ०८ तासाच्या तीन शिफ्टकरीता प्रत्येकी एक याप्रमाणे) तसेच स्त्रियांच्या निवाऱ्याकरीता किमान एक स्त्री काळजीवाहक कर्मचारी नियुक्त करावेत सदर बाबीवरील खर्च हा घटकांच्या "देखभाल व व्यवस्थापन" खर्चा मधून करावयाचा आहे.

मार्गदर्शक सुचनानुसार एका निवाऱ्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी एका वर्षासाठी जास्तीत जास्त रु.०६.०० लक्ष पुढील बाबी करीता खर्च करता येईल.

१) निवाऱ्यांची वार्षिक देखभाल (त्यानुसार विद्युत/देयक व इतर संकिर्ण खर्च)
२) वार्षिक सेवा खर्च (त्यामध्ये लाभार्थ्यांना मुक्कामाकरीता झोपतांना लागणाऱ्या अंथरुण/पांघरुणाची खरेदी व त्यांची धुलाई/देखभाल तसेच स्वयंपाकासाठी लागणाऱ्या उपकरणांची खरेदी व देखभाल)
३) मोफत अन्नाकरीता वार्षिक खर्च (एकुण लाभार्थ्यापैकी जास्तीत जास्त १०% लाभार्थ्यांना जे वृध्द व्यक्ती तसेच जे खर्च करुन शकत नाही असे)
४) कर्मचाऱ्यांच्या वेतनावर होणारा खर्च

वर नमुद केलेल्या रु.०६.०० लक्षापेक्षा जास्त खर्च झाल्यास त्याचा खर्च "नागरी संस्थेने" करावा तसेच प्रत्येक निवाऱ्यामध्ये खालील नमुद केलेल्या नोंदवहया ठेवाव्यात.

१) निवाऱ्यांच्या मालमत्तेची नोंदवही
२) खर्चाचे व उत्पन्नाची रोख नोंदवही
३) हजेरी पुस्तक
४) निवारा व्यवस्थापन समितीच्या बैठकीची नोंदवही
५) वेतन नोंदवही
६) तक्रार व सुचना नोंदवही

उक्त नमुद मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी असे निर्देश आहेत. निवाऱ्यांच्या बांधकामासाठी अथवा जुन्या बांधकामाच्या नुतनीकरणाकरीता लागणाऱ्या खर्चापैकी ७५ % निधी केंद्रशासन व २५ % निधी राज्य शासन देणार आहे.

त्याप्रमाणे मनपा हद्दीत एकुण ०५ ठिकाणी निवारे साठी जागा उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे. मा. संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी, यांचेकडुन "शहरी बेघर निवाऱ्यांच्या" नुतनीकरण, संचलन व व्यवस्थापन करणेकामी तरतुद मंजुर होणार आहे. त्याअन्वये मा. महासभा दि.३१/०१/२०१६ (दि.१८/०१/२०१६ रोजीची तहकुब महासभा) सदर विषय मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता. मा. महासभेने प्रकरण क्र.१४९, ठराव क्र.११५ नुसार सदर विषय सविस्तर माहितीसह पुढील मा. महासभेत घेण्यात यावा असा ठराव मांडलेला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१९६/२००१ दाखल करण्यात आलेली आहे. याचिकेच्या अनुषंगाने दिलेले आदेश तसेच प्राप्त शासन मार्गदर्शक सुचनाअन्वये "शहरी भागात बेघर निवारे" सुरु करणे अत्यावश्यक आहे, तसेच मा. महासभा दि.३०/०१/२०१६ (दि.१८/०१/२०१६ रोजीची तहकुब मा. महासभा) ठरावाप्रमाणे सदरचा विषय पुन्हा मा. महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

आयुक्त
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. २५/०८/२०१८ वेळ ११.३०

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ७३

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग
## मा. महासभा दि. ०७/०५/२०१६

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक (१५)** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासनाच्या जमिनीवर जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) विकसित करणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे टुरीझम कॉम्पलेक्स फॉर एम.टी.डी.सी. (पर्यटक केंद्र) यासाठी राखीव आहे. मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण क्षेत्र ९९.९२ हेक्टर जागेपैकी ३१ हेक्टर जागेवर जैव विविधता उद्यानाची (Bio Diversity Park) निर्मिती करण्यासाठी महानगरपालिकेने मे. टेरेकॉन इकोटेक प्रा.लि. यांची तांत्रिक सल्लागार म्हणून (DPR) तयार करणेकामी नेमणूक करण्यात आली होती.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र.३८ मौजे उत्तन सर्व्हे क्र.३५२-अ या शासकिय जागेतील एकुण ९९.९२ हेक्टर जागेपैकी ६ हेक्टर जागा क्र.महसुल/क-१/टे/एलाबपा/आत संरक्षण/एसआर-०४/१० जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे दि.०७/१०/२०१० अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे संरक्षणासाठी हस्तांतर केलेली आहे. जैव विविधता उद्यान (Bio Diversity Park) तयार करणेकामी ३१ हेक्टर जागेची आवश्यकता लागणार असुन उर्वरीत जागा ताब्यात घेण्याकरीता मा. जिल्हाधिकारी ठाणे, यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर जागा हस्तांतरीत झाल्यानंतर सदर जागेवर जैव विविधता उद्यानाची निर्मिती पर्यटन विभाग, मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विकसित करता येऊ शकेल. तरी सदर प्रकल्पासाठी जागा ताब्यात घेणे व प्रकल्प राबविणेसाठी विचार विनिमय होऊन निर्णय होणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2016-17/DK/MG-3

गोषवारा प्राप्त ... २१/४/९६ वेळ 3.05

मा. स्थायी स. ... ...द्वारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १0

लिपिक २१/४/९६

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि. ०७/०५/ २०१६

## ।।गोषवारा।।

प्रकरण क्र. ९६: परवाना विभागाच्या देयकांबाबत.

मिरा भाईदर क्षेत्रात परवाना विभागामार्फ़त विविध व्यापारी आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार परवाने दिले जातात. सद्य स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कर विभागाचे माहितीनुसार एकूण ५०२८० व्यापारी आस्थापना असून परवाना विभागामार्फ़त केवळ अंदाजे १७०० परवाने दिले गेले आहेत.

परवाना विभागात केवळ १ वरिष्ठ लिपिक,१ लिपिक व १ शिपाई कार्यरत असून व्यापारी आस्थापनांना वेळोवेळी भेटी देणे, त्यांचे कागदपत्रे गोळा करणे व लायसन्स तयार करणे, लायसन्स फ़ी स्विकारून संबंधितांना परवाना देणे इ अनेक कामे परवाना विभागात विहित आहेत. परवाना विभागात कमी कर्मचारी असल्यामुळे प्रत्यक्ष जागेवर जाणे, परवाना वाटप, वसुली इ. कामे जलदरित्या प्रभावीपणे होत नाही.महापालिका क्षेत्रात व्यापारी आस्थापना वाढत आहे. परंतू कर्मचा-यांभावी नविन परवाना देणे व परवाना फ़ी वसुल करणे इ. कामे जलदगतीने होत नाही.

तरी सदर बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमणुक करणेबाबत तरतूद आहे. मिरा भाईदर क्षेत्रातील सर्व आस्थापनांना प्रत्यक्ष भेटी देणे, व्यापारी आस्थापनांचे मोजमाप घेणे त्यानुसार कागदपत्रे गोळा करणे, परवाण्यासाठी प्रस्तावित करणे, वितरीत करणे व वसुली करणेकामी महापालिकेस मदत करणे इ. कामी अभिकर्ता नेमून सदर अभिकर्त्यामार्फ़त उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केल्यास परवाना देणे, नुतनीकरण करणे इ. कामे सुलभ होईल व परवाना फ़ी वसुली मध्ये वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६६ अ नुसार अभिकर्ता नेमेणेची तरतूद आहे. ७२अ नुसार सदर कामी निविदा मागविता येतील. तरी मा.महासभेची मान्यता घेऊन निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी प्रस्ताव मा.महासभेसमोर मान्यतेस्तव सादर.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.१२/३/२०१६ वेळ ५:१५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २४

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०७/०५/२०१६

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १८ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्याबाबत ...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अत्यंत अपुऱ्या मार्केट इमारती असल्याने व शहरातील लोकसंख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या स्वरुपात मार्केट इमारती बांधण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने मार्केट इमारतीची कामे सुरु आहेत. सद्यस्थितीत शहरात मोठ्या स्वरुपात विक्रेते रस्त्यावर बसत असून त्यामुळे वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. त्यासाठी शहरात विविध ठिकाणी रस्ते सोडून तात्पुरत्या स्वरुपात मार्केटसाठी जागा उपलब्ध करुन व्यवस्था केल्यास रस्त्यावरील फेरीवाल्यांना हटविता येईल. सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे आरक्षणातील ताब्यात आलेल्या व विकसित न केलेल्या भुखंडावर शहरात ठिकठिकाणी क्रॉंक्रिटीकरण करुन त्यावर तात्पुरत्या स्वरुपात विक्रेत्यांना बसविता येईल. तरी सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन शहरातील नागरीकांच्या सोयी सुविधेच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरूपात फेरीवाले बसविण्यासाठी आरक्षणाच्या प्राप्त जागेवर मार्केट तयार करण्यासाठी ठिकाणे निश्चित करण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC3/16-17/DK/MG-1

गोषवारा प्राप्त दि. ०२/०५/१९ वेळ १०.३५
~~मा. स्थायी समिती~~ / [illegible] गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ९८

लिपीक
नगरसचिव विभाग

106 Maha 16

(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०५/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (१८) - शहरी गरीबांना मुलभुत सुविधा पुरविणे योजने बाबत विनियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ठ करणेसह त्याअंतर्गत अनुज्ञेय २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल मर्यादित वाढ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.**

शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय क्र. ज.ने.यो.२००६/प्र.क्र.-४६ /गृनिधो, दि.२५/०६/२००७ नुसार यापुर्वीची राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना या दोन केंद्र शासन पुरस्कृत योजना केंद्र शासनाने बंद करण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे सदर दोन्ही योजनांचा समावेश एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या नविन कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेला आहे.

वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनांचा उद्देश एकसारखा म्हणजे शहरी भागातील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान उंचावणे व त्यांना पर्याप्त निवारा, मुलभूत सोयी उपलब्ध व त्यांना शहरातील झोपडपट्टीवासीयांचे राहणीमान व जीवनमान सुखावह करुन सभोवतालच्या परिस्थितीत सुधारणा करणे हा आहे. वाल्मिकी आंबेडकर आवास योजना आर्थिक दृष्टीकोनातून सक्षम ठरत नसल्यास व ती राबविण्यास अडचण येत असल्यास अशा झोपडपट्यांच्या विकासासाठी शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या गृहनिर्माण विभागाच्या क्र. एचएसजी/२००२/प्र.क्र. ४/गृनिधो-१, दि.१९/०९/२००२ रोजीच्या निर्णयानुसार २.५० चटईक्षेत्र निर्देशांकाची सवलत दिलेली होती तथापि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) राबविण्यात येणा-या योजनेच्या शासन निर्णयामध्ये याप्रकारे तरतूद नसल्यामुळे अशी सवलत महानगरपालिकेच्या / नगरपरिषदेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणे आवश्यक असल्याने शासनाने नगरविकास विभागाचे आदेश क्र. टीपीएस-११०७/अनौ.३६/ प्र.क्र.१३५/०८/नवि-९, दि.२४/०८/२००८ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माणे व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून काही अटीवर सदर योजनेसाठी २.५० चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही सुरु करण्याचे निर्देश दिलेले असून सदर योजना वर्धनक्षम करण्यासाठी उक्त नमुद २.५० चटईक्षेत्र निर्देशांकामधील काही क्षेत्र विक्री घटकासाठी ज्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार वाणिज्य अथवा निवासी प्रयोजन शक्य असेल त्याप्रमाणे वापरण्यास मुभा देवून सदरचे विक्री घटकांचे गाळे विक्री करुन अथवा भाडेतत्वावर देवून सदर योजना महानगरपालिका / नगरपालिका वर्धनक्षम करु शकते, असे शासनाचे मत झाल्यामुळे दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन नव्याने निर्देश देण्याचे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्यामुळे शासनाने दि.२८/०४/२००८ रोजीचे निर्देश रद्द करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५४ अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने महानगरपालिका / नगरपालिकांना खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

## // निर्देश //

गृहनिर्माण विभागाचा निर्णय दिनांक २५ जून, २००७ नुसार जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनर्निमाण अभियानांतर्गत (JNNURM) शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या उपकार्यक्रमात समाविष्ट केलेले मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे व नांदेड या पाच नागरी समुहासह सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना व नगरपरिषदांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश देण्यात येतो की, त्यांनी विकास नियंत्रण नियमावलीमध्ये एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या योजनेची अंमलबजावणी नियोजनाच्या दृष्टीने प्रभावी व सुरळीतपणे करता यावी म्हणून खालील अटींवर सदर योजनेसाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ठ करण्याबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही पुर्ण करुन शासनास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करावा.. शासन पुढे असे निर्देश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये मंजूरी प्रलंबित असेपर्यंत सदर तरतूद लगेच अंमलात आणावी.

१) सदर निदेश हे एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP), शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), अल्प उत्पन्न गट (LIG) व संक्रमण गाळे या शहरी गरीबांसाठी असलेल्या गृहनिर्माण योजनांकरिता लागू असतील.

२) सदर योजना महानगरपालिकेने / नगरपरिषदेने स्वतः राबवावी.

३) अनुज्ञेय २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या कमाल विक्री घटकामध्ये १५% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच या १५% मर्यादित जर एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) व शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) योजना सुसाध्य (Viable) होत नसतील तर उपाध्यक्ष, म्हाडा यांच्या सविस्तर छाननीअंती आणखी १०% चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी अनुज्ञेय करण्यात यावा.

४) उक्त मुद्दा क्र. ३ मुळे निर्माण होणारे विक्री घटकातील गाळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार विक्री करण्यास अथवा भाडेपट्ट्यावर देण्याबाबत महानगरपालिका / नगरपरिषगांना परवानगी देता येऊ शकेल.

५) सदर प्रस्तावात येणारी सर्व आरक्षणे विकसीत करणे आवश्यक राहील. मात्र बांधकाम योग्य आरक्षणे (खुल्या स्वरुपाची आरक्षणे सोडून) समावेशक आरक्षणांच्या माध्यमाच्या धर्तीवर, त्यामध्ये नमुद केलेल्या क्षेत्राइतके सुविधा क्षेत्र घेऊन उर्वरीत बांधकाम गृहबांधणीसाठी करण्याच्या अधिन राहून विकसीत करावी लागतील.

६) शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) योजनांना २.५ चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करतांना खुल्या जागा (open spaces), बाजूच्या मोकळ्या जागा (side margins), इत्यादींच्या बाबतीत आवश्यकतेप्रमाणे झोपडपट्टी पुर्नवसन योजना (SRA) प्रमाणे सवलत देण्याची उचित कार्यवाही संबिधित नगरपालिका / महानगरपालिकेचे मुख्य अधिकारी / आयुक्त यांनी करावी.

वरिलप्रमाणेच्या शासन निर्देशाप्रमाणे सदर विनियम मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सामाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तसेच सदर शासन निर्देशामध्ये नमुद केल्याप्रमाणे २५% क्षेत्र विक्री घटकासाठी अनुज्ञेय केलेले असून महानगरपालिकेच्या दि.१३/०७/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ३२ अन्वये महानगरपालिकेमार्फत सुरु असलेली शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP) या अंतर्गत सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी वाणिज्य वापरामधून निधी उपलब्ध करुन सदर प्रकल्प पुर्ण करण्यास मान्यता दिलेली असून सदर प्रकल्प पुर्ण करण्यासाठी २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादित महानगरपालिकेस ४६% ते ५०% पर्यंत क्षेत्र विक्री धारकांसाठी अनुज्ञेय करावे लागणार असल्यामुळे सदर मर्यादा २५% ऐवजी ५०% पर्यंत केल्यास महानगरपालिकेस सदर प्रकल्प पुर्ण करणे शक्य होणार आहे. याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

यास्तव शासन निर्देशाप्रमाणेची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणेसह २५% ऐवजी ५०% क्षेत्र विक्री घटकांसाठी अनुज्ञेय करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेसाठी निर्णय होणेस मा. महासभेसमोर सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि ३१/५/२०१५ वेळ १.० ३५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ०१

लिपिक
नगरसचिव विभाग.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा.महासभा दि. ०७/०५/२०१६**

**।। गोषवारा ।।**

**प्रकरण क्र.१९ - मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नविन ई- वाचनालयासंबधीचे धोरण ठरविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने नगरवाचनालय, दुसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, भाईंदर (प.), श्री.पद्‌मसागर सुरीश्वरजी भवन, तळमजला, प्र.स.का.क्र.०६ रामनगर, मिरारोड (पु.), जांगीड ॲमिनीटी हॉल, दुसऱ्या मजला, मिरा रोड (पु.) व आरक्षण क्र. ३१८ सिल्व्हर सरीता, दुसरा मजला, काशिगांव येथे नविन ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करण्यात आले आहे. ई-वाचनालय ही संकल्पना पुर्णतः नविन असल्यामुळे त्याबाबतचे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

मिरा भाईदर महानगरपालिकेच्या क्षेत्रात वरील चार ठिकाणी मनपाने बांधकाम विभागामार्फत ई-वाचनालय व अभ्यासिका तयार करणेसाठी रक्कम **रु.१.८८ कोटी** इतका भांडवली खर्चाबाबत कळविले आहे.

नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक संच, नेटवर्कींग व इतर साहीत्य खरेदी व इंटरनेट डिपॉझीट करणेकरीता मनपाने संगणक विभागामार्फत **रु.१३,३५,९९५/-** इतका खर्च केलेला आहे. उर्वरीत दोन ठिकाणी देखील याकरीता खर्च होणार असल्याचे कळविले आहे.

संगणक विभागाने नगरभवन व रामनगर या दोन ठिकाणी संगणक साहीत्य, देखभाल दुरुस्ती, घसारा व इंटरनेट कामी वार्षिक खर्च **रु. ५,३४,४४१/-** येणार आहे असे नमुद केले आहे.

बांधकाम विभागाने उक्त ई-वाचनालय / अभ्यासिकेच्या देखभाल दुरुस्ती व वीज बीलापोटी **रु. २१.४० लक्ष** वार्षिक खर्च येणार आहे असे नमुद केले आहे.

या व्यतिरिक्त उक्त ई-वाचनालय व अभ्यासिका येथे दैनंदिन कार्यकालीन कामकाज, साफसफाई आदी कामांकरीता मनपाचे कर्मचारी नियुक्त करुन त्यांचे वेतनासाठी देखील खर्च होणार आहे. सबब त्यानुसार काही प्रमाणात प्रत्येक विदयार्थ्यांकडुन दरमहा/वार्षिक फी आकारणे उचित होईल.

महानगरपालिकेने उक्तप्रमाणे अभ्यासिका व ई-वाचनालय मध्ये संगणक, फर्निचर, वातानुकुलीत यंत्रणा आदी अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सबब खालीलप्रमाणे ई-वाचनालय करीता धोरण व फी ठरविणे तसेच अभ्यासिकांकरीता फी ठरविणे उचित होईल.

अ) **ई-वाचनालयाकरीता प्रवेशाबाबतचे धोरण :-**

०१) ई-वाचनालयात १२ वी व त्यापुढे शिकणाऱ्या विदयार्थ्यांना प्रवेश देणे.

०२) ई-वाचनालयाकरीता नविन सभासद नोंदणी करुन घेणे.

०३) ई-वाचनालय सकाळी १०.०० ते ५.४५ वाजेपर्यंत उघडे ठेवणे.

०४) प्रत्येक ई-वाचनालयाकरीता एका संगणक तज्ञांची नियुक्ती करणे.

०५) प्रत्येक ई-वाचनालयात एका सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणे.

०६) ई-वाचनालयातील सभासदास जास्तीत जास्त १ तास संगणक हाताळण्यास परवानगी देणे.

०७) ई-वाचनालयात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश देणे.

ब) **ई-वाचनालयाकरीता फी बाबतचे दर :-**

०१) ई- वाचनालय प्रवेश फॉर्म फी - रु. ०५/-

०२) मासिक फी - रु. २००/-

०३) अनामत - रु. १०००/-

क) **अभ्यासिकेच्या फी बाबतचे दर :-**

| अ.क्र. | तपशिल | पुर्वीचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ०१ | फॉर्म फी | रु. ०५/- | रु. ०५/- |
| ०२ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरविरहीत) | रु. ०२/- | रु. ५००/- |
| ०३ | वार्षिक अभ्यासिका फी (लॉकरसहीत) | -- | रु. १०००/- |

तरी वरील प्रमाणे नव्याने विकसीत केलेल्या ई-वाचनालय व अभ्यासिकेत प्रवेश व फी बाबत धोरणात्मक निर्णयासाठी मा. महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०५/२०१६

## ।। गोषवारा ।।

(७)

प्रकरण क्र. २० **महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-०४ या संवर्गातील सफाई कामगार पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कालबध्दपदोन्नती योजने अंतर्गत वरिष्ठ पदाचा लाभ देणेकरीता शैक्षणिक अर्हता शिथील करणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन नियमानुसार आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत, सेवेत एकाच पदावर नियमित १२/२४ वर्ष सेवा झाल्यास, त्यांना वरिष्ठ श्रेणी पदाचा लाभ देण्याची कार्यवाही प्रशसनाकडून करण्यात येते. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देताना सदर वरिष्ठ पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व अर्हता संबंधित कर्मचाऱ्यांने धारण करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून आस्थापनेवरील वर्ग -०४ या संवर्गातील सफाई कामगार, या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना एकाच पदावर सतत १२/२४ वर्ष सेवा झाल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय पदोन्नती समोर सादर केला होता. विभागीय पदोन्नती समिती सभा दि. २२/०३/२०१६ रोजी झाली असता, सफाई कामगार, वर्ग-०४ यांना वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्यास, वरिष्ठ वेतनश्रेणी देणेबाबत नमुद करण्यात आलेले असल्याने सदर विभागीय पदोन्नती समितीत जे कर्मचारी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हत पूर्ण करीत नाहीत. त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पद्धत | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक आरोग्य | सफाई कामगार | नामनिर्देशन १००% | अ) ४ थी उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक. |
| २ | | मुकादम | पदोन्नती १००% | इयत्ता ७ वी उत्तीर्ण व महापालिका आस्थापनेवरील ज्येष्ठता व गुणवत्ता यांच्या आधारे सफाई कामगार पदाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

तत्कालीन नगरपरिषद काळात (दि.१२/०६/१९८५ ते दि.२८/०२/२००२) नियुक्ती अथवा कायम केलेल्या सफाई कामगारांची शैक्षणीक अर्हता इयत्ता ७ वी पेक्षा कमी आहे. तत्कालीन नगरपरिषद काळातील शासन निर्णय क्र. एमसीके/११९१/सीआर-५७/९१/६, दि. ११ मार्च, १९९१ अन्वये सफाई कामगार यांची शैक्षणिक अर्हता "साक्षर" असे नमुद आहे. नगरपरिषद कालावधीत सदर शासन निर्णय नुसार साक्षर अशी किमान अर्हता असणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना नियूक्ती अथवा कायम कलेले आहे, अशा कर्मचाऱ्यांना सद्यस्थितीत महानगरपालिकेचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-२०१४ मधील तरतुदी अन्वये सातवी इयत्ता उत्तीर्ण अशी अर्हता धारण करीत नसल्याने त्यांना कालबध्द पदोन्नती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय करणे शक्य होत नाही. सदरचे इयत्ता पेक्षा कमी शैक्षिणक पात्रता असणाऱ्या कर्मचाऱ्यांना यापुढे पुढील शिक्षण घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे दि.२२/०३/२०१६ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती निवड समितीने, नगरपरिषद कालावधीतील नियुक्त अथवा कायम केलेल्या सफाई कामगार कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नोती योजने अंतर्गत वरीष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देणे करीता त्यांना शैक्षणीक अर्हतेतून सूट देणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभेत ठेवणेस शिफारस केलेली आहे. तरी याप्रमाणे प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.१८/०४/२०१८ वेळ ११:१० वा.
~~मा. स्थायी समि~~/महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ..........

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

(७)

## मा. महासभा दि.०७/०५/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. : ८१ मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM-II या केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस GCC या तत्वावर चालविण्यासाठीचा धोरणात्मक निर्णय घेणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. (Public Privet Partnership) या तत्वावर खाजगी ठेकेदार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून शहरातर्गत व शहराबाहेरील बस मर्गावर बसेस चालविणेसाठी JnNURM -I या योजने अंतर्गत प्राप्त ५० बसेस, तत्कालीन खाजगी ठेकेदार मे. महालक्ष्मी इन्फ्रा. प्रा. लि. यांच्या ५२ अशा १०२ बसेस चालविणेचा ठेका पूढील १० वर्षाच्या कालावधीत देणेत आलेला होता.

मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांना पी.पी.पी. तत्वावर ठेका प्रति कि. मिटर रु.१/- या रॉयल्टी तत्वावर देणेत आलेला होता. मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांचे कडुन निविदेद्वारे प्राप्त रॉयल्टी रु.१/- हे दर मे. सी. आय. आर. टी. संस्था (Central Institute of Road Transport) पूणे यांच्याकडे तपासुन ते आलेले दर योग्य असल्याचे सांगण्यात आले होते. यामध्ये मे. केस्ट्रल यांनी बसेस चालविणे, मेनटेनन्स, दुरुस्ती, वंगण- इंधन, व ड्रायव्हर, कंडक्टर, निरिक्षक, प्रवर्तक, तांत्रिक कर्मचारी नियुक्ती व वापर, तिकिटाच्या रुपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास प्रदान करणे हया बाबीचा समावेश होता. त्यानुसार मे. केस्ट्रल इन्फ्रा. प्रा. लि. यांना दि. १०/१०/२०१० रोजी पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात पी.पी.पी. तत्वावर बसेस चालविणेचा ठेका देणेत आला होता. करारनाम्यातील अटी-शर्तीनुसार बसेस चालविणे, प्रति कि.मी १/- प्रमाणे रॉयल्टी रक्कम भरणे हे ठेकेदारास बंधनकारक होते. ठेकेदाराने माहे ऑक्टो. २०१० ते नोव्हेंबर २०११ पर्यंत रॉयल्टी रक्कम परिवहन फंडात जमा केली होती. त्यानंतर मात्र सातत्याने त्यांनी काही महिन्यांचा अपवाद वगळता रॉयल्टी रक्कम भरलेली नाही. सन २०१० ते मार्च २०१५ पर्यंत च्या कालावधीतील एकूण रॉयल्टी रक्कम रु.१,८१,७२,०४०/- (अक्षरी एक कोटी ऐक्याऐंशी लाख बहात्तर हजार चाळीस मात्र) इतकी थकीत आहे. पी.पी.पी. ठेकेदाराकडुन मंजूर मार्गावर पूर्ण क्षमतेने बसेस न चालविणे, बसेसची दुरुस्ती न करणे, बसेस मेनटेनन्स न करणे अशा तक्रारी प्रवासी व लोकप्रतिनिधी यांच्याकडून वारंवार येत होत्या. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडून ठेकेदारास नोटीसा बजावण्यात आल्या. रॉयल्टी रक्कम वेळच्या वेळी भरत नसल्याने रॉयल्टी रक्कम भरणेसाठी तसेच शासनाकडील थकीत प्रवासी कर व बालपोषण अधिभार शासनास अदा करणेसाठी नोटीसा बजावण्यात आल्या. परंतू मे. केस्ट्रल यांनी थकीत

रॉयल्टी मिरा भाईंदर महानगरपालिका उपक्रमास अदा केली नाही. तसेच शासनाकडेही प्रवासी कर व बालपोषण अधिभार जमा केले नाही. सेवेतही कोणताही बदल न होता सेवा खालावत गेली. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र ४८ नुसार करारनामा रद्द करण्याची नोटीस मे. केस्ट्रल यांस दि. ३१/०१/२०१५ रोजी बजावण्यात आली. त्यानुसार मे. केस्ट्रल यांनी दि. ११/०२/२०१५ रोजीच्या पत्रात करारनाम्यातील अटीशर्तीनुसार लवादाची तरतुद असल्यामुळे लवाद नेमुन पुढील कार्यवाही करणे संदर्भात नमुद केले. त्यानुसार दोन्ही पक्षाच्या संमत्तीने श्री. आशुतोष कुंभकोणी, वरिष्ठ वकिल, उच्च न्यायालय, मुंबई यांची 'Arbitrator' म्हणून नियुक्ती केली गेली व पुढील कार्यवाही चालू आहे.

दरम्यानच्या कालावधीत JnNURM -II या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडुन १०० बसेस मंजूर झालेल्या असून डेपो साधन सामुग्री करिता व ITS ची अंमलबजावणीसाठी जागतिक बँककडुन अनुदान मंजूर झाले आहे. सदरच्या कालावधीत वरील परिच्छेदात नमुद केल्यानुसार पी.पी.पी. तत्वावरील बसेस सेवेची स्थिती पाहुन मनपा प्रतिनिधी, World Bank चे प्रतिनिधी, केंद्र शासन नियुक्त Consultant M/S. Deloitee व मनपाने नियुक्त केलेले Consultant UMTC यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या संयुक्त बैठकीत JnNURM -II या योजने अंतर्गत प्राप्त बसेस हया GCC तत्वावर चालविणे आवश्यक असून, GCC तत्वावर नेमलेल्या ठेकेदारास किलोमीटर प्रमाणे निश्चित रक्कम प्राप्त होणार असल्याने ठेकेदाराकडून नागरिकांना दर्जेदार बस सुविधा मिळणार असून GCC तत्वावर बसेस चालविण्याचा निर्णय घेण्यात आला.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने NCC/ GCC तत्वावर बसेस चालविणेचा धोरणात्मक निर्णय घेणेसाठी दि.३०/१०/२०१६ रोजीच्या (तहकुब) महासभेमध्ये मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन त्यानुसार निणर्य घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार दि. २३/०३/२०१६ व दि. २९/०३/२०१६ रोजी बसेस चालविण्याचे धोरणात्मक निर्णय घेणेसाठी ०२ वेळा मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली मा. गटनेत्यांची बैठक घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीत परिवहन उपक्रमाच्या बसेस हया NCC तत्वावर चालविणेबाबत बहुतांश सदस्यांचे मत झालेले आहे.

महानगरपालिकेकडून नियुक्त करण्यात आलेल्या मे. UMTC या सल्लागाराकडून NCC (Net Cost Contract) व GCC (Gross Cost Contract) बाबत तुलनात्मक अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसारः-

अ) NCC - सदर तत्वावर बसेस चालविणेसाठी चालक नेमणे, बसेसचे मेनटेनन्स करणे, दुरुस्ती करणे, इंधन आणि वंगण याचा खर्च करणे, तिकिटाच्या रुपात उत्पन्न गोळा करणे, शासकीय कर शासनास प्रदान करणे ही जबाबदारी ठेकेदाराची असते.

सदर तत्वावर बसेस चालविताना NCC ठेकेदाराकडून ज्या बस मार्गावर नफा (Profit) आहे अशाच बस मार्गावर व अशावेळी बसेस चालविल्या जातात. त्यामुळे सेवेवर विपरीत परिणाम होतो. सुरुवातीस चांगली सेवा दिली जाते, परंतू सिस्टीम विस्कळीत होते, ठेकेदारास सहन करावा लागणारा तोटा अनुदानाच्या रुपात उपक्रमाला भरुन द्यावा लागतो. हे अनुदान निश्चित करणे, त्याचे पर्यवेक्षण करणे खुप कठीण असते, Frequency न मिळता तसेच मेनटेनन्स न करता बसेसची Occupancy मिळविण्याकडे ठेकेदाराचा कल असतो. सदर तत्वावर निकृष्ट प्रतीचे मेनटेनन्स करण्याची ठेकेदाराची प्रवृत्ती वाढून काही वर्षानंतर ठेकेदाराकडून सेवा स्थगित केली जाण्याची शक्यता निर्माण होते.

ब) GCC – सदर तत्वामध्ये महानगरपालिकेने ठरविलेल्या बस मार्गावर Schedule प्रमाणे बसेस चालविणे, त्यासाठी वाहन चालक नेमणे, बसेसची दुरुस्ती करणे, मेनटेनन्स करणे, इंधन-वंगण यांचा खर्च करणेची जबाबदारी ठेकेदाराची असते. यामध्ये वाहक, प्रवर्तक, निरिक्षक कार्यालयीन कर्मचारी नियुक्ती करुन तिकिट भाडयाच्या रुपात उत्पन्न गोळा करणे, प्रवासी कर, बालपोषण अधिभार शासनाकडे जमा करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असते. यामध्ये काही नुकसान झाल्यास ते महानगरपालिकेकडून भरुन दिले जाते. महानगरपालिकेकडून प्रती कि. मी. प्रमाणे निश्चित दर GCC ठेकेदारास द्यावे लागते.

मे. UMTC यांनी सादर केलेल्या Financial Analysis नुसार दोन्ही प्रकारच्या तत्वावर बसेस चालविणेसाठी तुट येणार आहे. NCC तत्वावर येणारी तुट भरुन काढण्यासाठी महानगरपालिकेस ठेकेदारास अर्थसहाय्य करावे लागणार आहे. सबब World Bank प्रतिनिधी व केंद्रशासन नियुक्त सल्लागार यांच्या दि. ३१/०८/२०१५ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार GCC तत्वावर बसेस चालविणे अधिक लाभदायक ठरणार असून नागरिकांना दर्जेदार सेवा देणेसाठी GCC तत्वावर बसेस चालविणे योग्य वाटते.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM -II अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस अधिक काळ पर्यंत चांगली सेवा देण्याकरिता GCC हया तत्वावर चालविणेसाठी सदर विषय फेर विचारार्थ पुनश्च: मा. महासभेत घेणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Transport\Ghashwara - Gcc tatwavar buses.docx

गोषवारा प्राप्त दि. ०७/४/२०१९ वेळ ५:४०

मा. स्थायी समिती [illegible] बैठकीत

नोंद रजिस्टर. 03

लिपीक

नगरसचिव विभाग.

(१)

नगररचना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. ०७/०५/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्र (२४) – मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील इमारतींना वापर परवाना देणेबाबतच्या विशेष सवलत मोहिमेस मुदतवाढ देणेबाबत.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ६(७)(८) प्रमाणे शहरामधील इमारतीसाठी भोगवटा दाखला देण्याची कार्यवाही करणेत येत असून मिरा भाईंदर शहरामधील भोगवटा न घेता वापर सुरु असलेल्या व ५ वर्षापुर्वी नोंदणी झालेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी भोगवटा दाखला देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेसाठी दि.२३/०३/२०१५ रोजीच्या मा. महासभेने ठराव क्र. ७२ अन्वये अटीशर्तीच्या आधारे मान्यता दिलेली आहे. सदर मोहिमेची मुदत दि.०१/०४/२०१६ रोजी संपूष्टात आलेली आहे.

सदर मोहिमे अंतर्गत भोगवटा दाखला मिळणेकामी दाखल झालेल्या अर्जांपैकी बहुतांश प्रकरणामध्ये आवश्यक कागदपत्राची पुर्तता नसल्यामुळे प्राप्त अर्ज नामंजूर करणेत आलेली असून यापैकी दोन प्रकरणामध्ये सहा इमारतींसाठी मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर मंजूर केलेल्या प्रकरणासाठी आवश्यक असलेल्या रक्कमेचा भरणा करणेबाबत संबंधित विकासक, वास्तुविशारद व गृहनिर्माण संस्था यांना पत्र देण्यात आलेले असून सदर रक्कमेचा भरणा अद्याप करणेत आलेला नसल्यामुळे प्रकरणे निर्गमीत करणेत आलेले नाहीत.

सदर विशेष सवलत मोहिमेसाठी अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे सदर मोहिमेसाठी पुढील एक वर्षाची मुदतवाढ दिल्यास शहरामधील रहिवाशांना याचा फायदा होणार आहे.

सदर योजनेसाठी अर्ज करतांना आवश्यक कागदपत्राचा व अटीचा तपशील खालीलप्रमाणे आहे. -

१) इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे किंवा मंजूर चटईक्षेत्राच्या मर्यादित असणे आवश्यक आहे.

२) इमारतीच्या बांधकाम परवानगी वेळी अस्तित्वात असलेल्या तत्कालीन नियमाप्रमाणे अग्निशमन व्यवस्थेबाबत नाहरकत दाखला आवश्यक आहे.

३) अर्जासमवेत वास्तुविशारदाकडील इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे पुर्ण झालेबाबतचा पुर्णत्वाचा दाखला व संरचना अभियंता (Structural Engineer) यांचेकडील इमारत तांत्रिकदृष्ट्या योग्य असलेबाबतचा स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४) अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी किंवा इमारतीसाठी मालमत्ता कराची आकारणी कमितकमी पाच वर्षापुर्वीची असावी, म्हणजेच पाच वर्षा पेक्षा कमीचा कालावधी करिता वापरात असलेल्या गृहनिर्माण संस्थेसाठी सदर सवलत लागु राहणार नाही.

(२)

५) अर्ज केलेल्या इमारतीच्या जागेसाठी यु.एल.सी. विभागामार्फत कलम-२० चे आदेश पारित झालेले असल्यास शासनास देय असलेल्या सदनिका हस्तांतरीत केलेबाबत व भोगवटा दाखल्यासाठीचा युएलसी विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे.

६) इमारतीच्या बांधकाम परवानगीमध्ये सोलार वॉटर हिटींग सिस्टीम किंवा रेन वॉटर हार्वेस्टींगची सुविधा पुरविणेबाबतची अट नमुद असल्यास त्याप्रमाणे सोलार वॉटर हिटींग सिस्टीम व रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वीत करणे आवश्यक आहे.

७) इमारतीसाठीच्या मोकळया जागेच्या कराचा भरणा संपूर्ण केलेला असावा.

८) सदर विशेष मोहिमेनुसार दंडनिय शुल्क रु.२००/- प्रती चौ.मी. आकारण्यात यावी.

सदर प्रकरणी मान्यता मिळणेसाठी प्रकरण मा. महासभेस सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.२५/०४/२०१६ वेळ १०.५० वा.
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ.क्र. ९५
लिपीक
नगरसचिव विभाग.

(१)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा सभा दि.०७/०५/२०१६

## – मिळकत विभाग

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( २३ ) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या शासकीय कार्यालयांना भाडेतत्त्वावर दिलेल्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी महानगरपालिकेमार्फत शासकीय कार्यालगतच्या जागा भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | नाव | प्रति महिना | भाड्याने दिल्याचा दिनांक | थकबाकी बाकी | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.), उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय | रु. ६,४७८/- | दि.२७/०१/२००९ | रु. १४,३३,५८६/- | भाडे भरणा करणेबाबत पत्र व्यवहार केला असून आजपर्यंत भाडे भरणा केलेला नाही. |
| २ | भाईंदर (प.), रेल्वेस्थानकाजवळील इमारती मधील राज्य परिवहन महामंडळ (एस.टी. डेपो जागा) | रु. ७४८८/- | दि.०१/०९/२००१ | रु. १३,१०,४००/- | |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, (नगरभवन) पहिला मजला, तलाठी कार्यालय | रु. ८०७२/- | दि.०१/११/१९९९ | रु. १५,९०,१८४/- | |
| ४ | मिरा रोड (पू.), रामनगर येथील राष्ट्रसंत आचार्य पदमसागर सुरीश्वरजी भवनमधील सह.दुय्यम निबंधक कार्यालय | रु. १२१७४७/- | दि.२१/०१/२०१३ ते दि.३१/१२/२०१७ | रु. २८,४८,८८०/- | |

वरील सर्व शासकीय कार्यालयांना वेळोवेळी भाडे भरण्याबाबत पत्र व सुचना नोटिसा देवूनही त्यांनी अद्यापपर्यंत भाड्याचा भरणा केलेला नाही. सदर जागा ह्या शासकीय कार्यालयासाठी वापरण्यात येत असल्याने महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करुन जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया केलेली नाही. तरी सदर जागेचे भाडे संबंधित जमा करीत नसल्याने जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही करणेबाबत निर्णय होणेस शिफारस आहे.

१८/०३/१६

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

~~नगरसचिव विभाग~~
स.प./न.स./स.प./आ.
दिनांक :

गोपनीय प्राप्त दि.१४/३/२०१६ वेळ ५.२०
मा. ~~स्थायी समिती~~ / ~~नगरसचिव गोपनीय~~ मा. महासभा
नोंद रजिस्टर अ. क्र. २८
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.०७/०५/२०१६**

**बांधकाम विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( २८ )** :- *मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "मुलभुत सोई सुविधांचा विकास" करीता* मंजूर झालेल्या विशेष निधीतुन करावयाच्या विकास कामांना मान्यता देणेबाबत.

शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८०/नवि-१६ दि. ८ मार्च २०१६ अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेस रु.१० कोटी एवढा "विशेष निधी" मंजुर करण्यात आला आहे. सदर १० कोटी रकमेत रु.१०.०० कोटी महानगरपालिकेचा हिस्सा लावून एकूण रु.२०.०० कोटी प्रकल्पावर खर्च करावयाचा आहे. सदर २० कोटी रकमेचे प्रस्ताव तयार करुन त्यास प्रथम महासभेची मान्यता घ्यावी लागेल. तद्नंतर सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील त्रिस्तरीय समितीपुढे प्रशासकिय मान्यतेसाठी सादर करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेस तरतूद करावयाची रु.१० कोटी रक्कम सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात कर्ज निधीतून उभारावयाची आहे. त्यानूसार खालील कामे "विशेष निधी"तून प्रस्तावित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १) | उत्तन येथे मार्केट स्थलांतरीत करण्यासाठी मार्केट मागील नाल्याची बांधणी करणे. | रु.४,१८,००,०००/- |
| २) | *मिरारोड (पूर्व) शांतीपार्क बालाजी हॉटेल ते देना बॅंक पर्यंतचा रस्ता सीमेंट* कॉंक्रीटचा तयार करणे. | रु.६,८१,१७,६००/- |
| ३) | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. १२१ वाचनालय बांधणे. | रु.२,७८,३०,०००/- |
| ४) | मिरारोड (पूर्व) अयप्पा मंदिर शेजारील नाल्यावर स्लॅब टाकणे. | रु.६०,००,०००/- |
| ५) | भाईंदर (प.) मोतीनगर येथे शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ६) | राष्ट्रीय महामार्गालगत आरक्षण क्र. ३६७ शाळा इमारत बांधणे. | रु.७५,००,०००/- |
| ७) | मिरारोड (पूर्व) हैदरी चौक ते नरेंद्र पार्क सर्कल कॉंक्रीट रस्ता करणे. | रु.२,६२,५२,४००/- |
| ८) | मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क रस्त्यालगत आरक्षण क्र. ३३१ मार्केट शेड बांधणे. | रु.१,००,००,०००/- |
| ९) | भाईंदर (पूर्व) आर.एन.पी. पार्क येथे कम्यूनिटी हॉल बांधणे. | रु.५०,००,०००/- |
| | **एकूण** | **रु.२०,००,००,०००/** |

तरी, शासन निर्णयानूसार महानगरपालिकेस प्राप्त होणारे रु.१०.०० कोटी व महानगरपालिकेचा हिस्सा रु.१०.०० कोटीची तरतूद सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात करण्यास व त्यामधून वरील प्रमाणे प्रस्तावित प्रकल्प हाती घेण्यासाठी मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

पोषवारा प्राप्त दि. ०२/०५/२०१९ वेळ १०.३५

मा. स्थायी समिती मा. महासभा

नोंद रजिस्टर अ.क्र. १८

नगरसचिव विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.०७/०५/२०१६

## बांधकाम विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (२५ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कारवाई केलेली वाहने ठेवण्यासाठी वाहतुक विभागास जागा देणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्ते तसेच सार्वजनिक ठिकाणी नो पार्कींग क्षेत्रात उभी राहणाऱ्या वाहनांवर तसेच वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर वाहतुक शाखेमार्फत कारवाई करुन सदर वाहने जमा करण्यात येतात. सद्यस्थितीत सदर वाहने वाहतुक विभागामार्फत एम.आय.डी.सी. च्या भुखंडावर ठेवण्यात येतात. सदर भुखंड ताब्यात घेण्याची प्रक्रीया एम.आय.डी.सी. मार्फत सुरु आहे. दरम्यानच्या काळात सदर जागा अत्यंत अपुरी असून वाहतुक शाखेकडे कारवाई केलेली वाहने ठेवण्यास जागा नसल्याने शहरातील वाहनांवर कारवाई करुन वाहने जमा करण्यास अडथळे निर्माण होत आहेत. महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत सद्यस्थितीत वाहतुक विभागासाठी आरक्षित जागा नाही. त्यासाठी नविन विकास आराखड्यात जागा आरक्षित करण्याची प्रक्रीया करता येईल, तथापी सद्यस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या ताब्यातील व विकसित न झालेला आरक्षणाचा भुखंड तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यासाठी व शहरातील वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करुन सदर वाहने उभी करण्यास वाहतुक विभागास जागा उपलब्ध होऊन कामास मदत होईल. तरी यांबाबत विचार विनिमय करुन आरक्षणाच्या जागेचे ठिकाण निश्चित करून तात्पुरत्या स्वरूपात वाहतूक विभागास जागा उपलब्ध करून देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC3/16-17/DK/MG-2

गोषवारा प्राप्त दि ०२/०५/२०१५ वेळ १०:३५

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. 20

लिपिक

नगरसचिव विभाग.